इलेक्ट्रिक वायरमन, टु व्हिलर ऑटो मेकॅनिक
सर्टिफिकेट कोर्स इन रेडिओ सर्व्हिसिंग
व्होकेशनल को
बॅचलर ऑफ लायब्ररी सा
सर्टिफिकेट को
कंपोझिंग,प्रिंटिंग ॲण्ड बाईंडिंग, क्राफ्टसमनशिप कोर्स इन बेकरी ॲन्ड कन्फेक्श
सर्टिफिकेट कोर्स इन टेलिव्हिजन सर्वि

जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर
(वरिष्ठ आणि कनिष्ठ)
कला, विज्ञान आणि वाणिज्य विद्याशाखा
कला विद्याशाखेत पदव्युत्तर शिक्षणाची सोय

इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च, बारामती, जि. पुणे
डिप्लोमा इन बिझिनेस मॅनेजमेंट
डिप्लोमा इन कॉम्प्युटर मॅनेजमेंट
मास्टर्स डिग्री इन पर्सोनेल मॅनेजमेंट

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बारामती, जि. पुणे
जून १९९३ पासून सुरु करण्यात येत आहे
वेल्डिंग, इलेक्ट्रिशियन, कारपेंटरी

विज्ञान कार्यशाळा, बारामती, जि. पुणे
मुलांचे वसतिगृह, बारामती, जि. पुणे
अनेकान्त मुद्रणालय, बारामती, जि. पुणे

# पारंपारिक प्रश्न ''स्त्री मुक्ती''

**कु. प्रगती भापकर**
द्वितीय वर्ष कला



''आज अधर्म धर्माचा टिळा लावून वावरतो,अनीती नीतीचे वस्त्र परिधान करते, अज्ञान ज्ञानाचा प्रचार करते, असत्य सत्याचे कांबळं ओढून घेते आणि सज्जनांच्या वेषात मारेकरीच वावरतात, आपल्या वर्तमानावर असे हे विनाशाचे घातक सावट पडले आहे. पण त्याहूनही जळजळीत सावट आहे ते अन्याय, पिळवणूक व पाशवी वृत्तीचा बळी ठरलेल्या स्त्रीवर. दुःखाने काठोकाठ भरलेल्या जीवनात सुख चोरपावलाने आले तरी ते दुःखाचीच दुसरी प्रतिमा भासते. स्त्रीला अश्रू पिऊन जगायचे कसे हेच शिकवले जाते. आणि जरी डोळ्यात आसवे उभारलीच तरी सुध्दा तिच्या मालकीची नसतात.

मान्य आहे की आधुनिक जगात स्त्रिया बऱ्याच सुधारलेल्या असल्या तरी बऱ्याच प्रमाणात त्या अजूनही खूप मागासलेल्या आहेत. विशेषत: इतर पाश्चात्य देशांपेक्षा भारतीय ''स्त्री'' अजून मागे आहे. भारतीय खेडयातील ''स्त्री'' डोळ्यासमोर उभी राहते तेव्हा बहुतेक वेळा असे आढळून येते की, परंपरा सोडायला स्त्रिया तयार नसतात. स्त्रीमध्येच स्व-विकासाची भावना मूर्त झालेली आढळते. अजूनही कॉलेजवर मुलींकडे अश्लीलतेने पाहिले जाते. घाणेरडे कॉमेंट्स केले जातात. रस्त्यावरती, बसमध्ये जाणून-बुजून स्त्रियांना धक्के मारण्यात मजा वाटते, आजदेखील बातमीपत्रात अल्पवयीन मुलींवर तीन-तीन वेळा बलात्कार केल्याच्या किळसवाण्या बातम्या मनाचे लचके तोडतात. जनतेचे रक्षक असणारे पोलीस, वकील, याहूनही पलीकडे आमदार, खासदारांसारखे नेतेच स्त्रियांवर,मुलींवर बलात्कार करतात. स्त्री ही एक उपभोग्य वस्तु आहे. तिला डोके आहे याची जाणीवच या नरकासुरांना झालेली नसते.

वस्तुस्थिती सांगते की अनेक स्त्रिया आय.ए.एस., आय.एफ.एस., झालेल्या आहेत. आपल्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी तर स्त्री जातीचा गौरवच म्हणावा लागेल. त्यांच्या बाबतीत तर म्हटले जात होते की Indira is the man in the parliament परंतु हजारात एक किंवा शंभरात एक असे हे प्रमाण आहे. त्यामुळे पूर्ण स्त्री जात सुधारली असे म्हणणे म्हणजे वास्तवतेकडे पूर्णपणे डोळेझाक करणे किंवा त्याबाबत पूर्णपणे अज्ञानी असल्यासारखे होईल. स्त्रियांचे हे प्रमाण किमान निम्म्यास निम्मे तरी असावयास हवे होते. पण आज सुशिक्षित स्त्रिया, ग्रॅज्युएट स्त्रियाही अन्याय सहन करतात. संस्कृतीच्या रुढींच्या जोखडातून त्या मुक्त होत नाहीत.

भारतीय संस्कृती महान आहे. पण स्त्रियांबाबत म्हटले तर भारतीय संस्कृती व परंपरेने भारतीय स्त्रीला विशिष्ट बंधनात बांधले व अन्याय सहन करण्याचे मोठेपण तिच्या भाळी लादले. याच संस्कृतीने स्त्रीला मंदिरातील देवता बनविले. त्यामुळे ती प्रथमपासूनच निष्क्रीय व दुर्बल बनत गेली व या पुरूषप्रधान संस्कृतीने घातलेल्या अनेक बंधनाखाली नकळतपणे कोणाची तरी गुलाम बनली. नेहमीच स्त्रियांकडून त्यागाची अपेक्षा केली जाते. ''ती कांही काळची पत्नी तर अनंत काळची माता'' या विशेषणाखाली तिला दाबले जाते. तिला ही राग, द्वेष, प्रेम या भावना आहेत, तिला संवेदना आहेत, मन आहे, थकणारे शरीर आहे, हे विसरले जाते. आतापर्यंत संकटांना तोंड देत देखील परमात्म्यास सतत म्हणणारी की ''अश्रू दिलेस त्याबद्दल खंत नाही, पण ते साठविण्यास दोनच डोळे दिलेस याची खंत वाटते.'' असे म्हणणारी स्त्री महान नव्हे काय?

नैसर्गिकपणेच स्त्रियांना काही गोष्टींचा त्रास सहन करावा लागतो. वरती ही संस्कृती, नंतर पुरुषांचा अहंभाव, मातृत्व येणे म्हणजे स्त्रीचा

दुसरा जन्म असतो. अशा परिस्थितीत मुलगी झाली तर सर्व कुटुंबाचे दडपण, मानसिक व शारीरिक छळ म्हणजे मुलीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत केवळ दुःखच-दुःख आणि मग ''हृदयी अमृत नयनी पाणी'' या विशेषणांच्या सरणावर तिचे प्रेत ठेवले जाते.

वास्तविक सासऱ्याने जावायाला विकत घेतले तरी गुलाम बनते मुलगी, पत्नी किंवा सून, मुलगा, पती किंवा जावई नव्हे. अफ्रिकेत पिळले जाणारे गुलाम विकत घेतले जात होते. मात्र आमच्याकडे पिळवणूक करणारे नवरे विकत घेतले जातात. अशा वेळेस आनंदी गोपाळांसारखीच मलाही पुरुषाची घृणा वाटते, पुरुष, पुरुष ही कुठल्या झाडाची मुळी आहे? याचा निष्कर्ष काय? इतर सगळ्या शब्दांच्या, कायद्यांच्या व्याख्या समाज काळानुसार बदलतो पौरुषांची व्याख्या कोणी अर्थसकट सांगेल काय मला? बायकोला मारलं तरी ते त्याचं पौरुष. आदर्श नवरा म्हणजे स्मार्ट समजूतदार रसिक मला समजून घेणारा व महत्त्वाचे म्हणजे माझ्यावर प्रेम करणारा, माझ्या कलागुणांना उत्तेजन देणारा एक चांगला मित्र.

एखाद्या स्त्रीने महाराशी लग्न केले तर ती महार. ब्राम्हणांशी केले तर ती ब्राम्हण. नवऱ्यागणीक नांव व जात बदलायला आम्हाला काही स्वतंत्र अस्तित्व आहेच की नाही ? नवऱ्याचे नाव ते आमचं नांव कसं होऊ शकतं ?

स्त्रियांना जो पर्यंत पूर्ण अधिकार नाही मग तो परंपरा किंवा संस्कृ असो वा पुरुष प्रधानतेने असो किंवा स्त्रियांचा अजाणतेपणा असो, तोपर्यंत घटनेतील व्यक्तिस्वातंत्र्याचे तत्व आपण पूर्णपणे अमलात अ असे होतच नाही.

स्त्रियांच्या या मागासलेपणामध्ये स्त्रीचा स्वत:चाच खूप वाटा आ कारण सासूकडून छळली जाणारी सून किंवा सुनेकडून सासू, याशि स्त्रियांमधील द्वेषभावना, मत्सर, मीपणा, निंदा करण्याचा स्वभाव यामुळे स्त्रीचा छळ करते.

शिवाजी महाराजांनी परस्त्रीला मातेसमान मानले, बहिणीच्या दृष्टीको स्त्रियांकडे पाहिले. शाहीराच्या पोवाड्यातून चित्तोडच्या रूपवान राणी पद्मि दर्दनाक कथा ऐकून व अल्लाउद्दीन खिलजीचा नालायकपणा ऐकून भर-बैठ पाणावलेल्या डोळ्यांनी उठणारा शिवाजी उरला नाही. आता तानाजीसा भगव्या झेंड्यांचा शिपाई केव्हाच काळाच्या ओघात निघून गेलाय. अ फक्त उदयभानूसारखे अश्लील, क्रूर मानवी प्राणी, की ज्यांच्या प्रचंड प्रमाण खरी मानवता व माणुसकी कोठे कोनाड्यात असेलही तरी ती जा नाही की जितक्या प्रचंड प्रमाणात मानवी क्रूरपणा जाणवतो. माणसां माणसां एक नातं असावं पण ते प्रेमाच्या धाग्यांनी बांधलेले, हे धागे ही इ पक्के असावेत की संशयाच्या व रागद्वेषाच्या नावांनी न तुटता माणुस जतन व्हावी. परंतु महत्त्वाची गोष्ट ही की-

रिश्ता वही सफल होता है ।
जहाँ दो-इन्सानोंमें बराबरी हो ॥
इन्सान वेही हैं, जिनके दिलोंमें प्यार हो ॥
प्यार यही होता है
जो इन्सानी दर्दको समझ सकता हो ॥

❖ ❖ ❖ ❖

ज्ञान थोडे का असेना पक्व हवे. खाण्यापेक्षा पचविण्यानेच सामर्थ्याची वृद्धी होते. आजारी मनुष्य खातो पण खाल्लेले पचविण्याचा सामर्थ्य त्याच्यात नसल्यामुळे खाल्लेला पदार्थही त्याचा बाधक होतो. तीच गोष्ट विद्येची आहे. ज्ञान थोडे का असेना परंतु ते पक्व असावे.

– प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराज

हे शरीर परोपकाराकरिताच आपणास प्राप्त झाले अ ही गोष्ट ध्यानात घेऊन त्याच कारणी लावावे. जनसेवा राष्ट्रसेवा व आत्मसेवा हेच ध्येय आपणापुढे निरं असावे.

– प. पू. गुरुदेव समंतभद्र महारा



# ''योग आणि जीवन''

**विजय चौधरी**
**द्वितीय वर्ष कला**



''छूता नहीं कोई बदनको चेतना निकल जाने के बाद
फेंक देते हैं फूल खुशबू निकल जाने के बाद ।''

''मी कोण आहे'' या मानवी जीवनाचे उद्दिष्ट काय ? कशासाठी जगायचे ? मी कोठून आलो ? मृत्यू म्हणजे काय ? मृत्यूनंतर कोठे जाणार ? ह्या सर्व मूलभूत प्रश्नांचे उत्तर हाच जीवनशोध. अनेक कोहीनूर हिऱ्यापेक्षा आपल्या शरीरातील इंद्रिये उदा. डोळे, हृदय वगैरे अधिक किमतीची आहेत. तर या सर्व वस्तूंचे ज्ञान ज्यामुळे होते तो आत्मा किंवा चैतन्यशक्ती त्याहून मोलाची आहे. हा आत्मा किंवा चैतन्यशक्ती आपणास योगाच्या माध्यमाने समजून घेता येते. योग हे एक शास्त्र आहे. जीवनाशी निगडित असलेले शास्त्र म्हणून त्यास जीवनशास्त्र असे म्हणता येईल. योगशास्त्राची सर्व अंगोपांगे ही जीवन म्हणजे काय ? का जगावयाचे ? हे तर सांगतातच पण कसे जगावयाचे याबाबतही उत्कृष्ट मार्गदर्शन करतात. म्हणून योगशास्त्र हे एक 'जीवन जगण्याची कला' शिकविणारे शास्त्र आहे. वास्तविक मानवाच्या सर्वांगाचा (भौतिक आणि अध्यात्मिक) समतोल विकास साधणारे, जीवन खऱ्या अर्थाने संपन्न करणारे असे हे महत्त्वाचे शास्त्र आहे. असे असूनसुद्धा सामान्य जनतेपासून मात्र दूर राहिले आहे. याचे कारण म्हणजे या शास्त्रासंबंधीचे प्रचंड अज्ञान व त्याही पेक्षा वाईट म्हणजे त्याबाबतचे गैरसमज होत. ते गैरसमज असे,

- 'योग सामान्यांसाठी नाही, योग म्हणजे चमत्कार, योग धार्मिक आणि चिंतनाचा विषय आहे, योग हा रोगी लोकांच्यासाठी आहे, योग म्हणजे केवळ आसने करणे. योग आत्मसात करण्यासाठी घरादाराचा त्याग करून रानावनात जाणे इ. खुळचट गैरसमजुती सामान्य जनतेत फार मोठ्या प्रमाणावर आहेत. म्हणून ते योग मार्गापासून फार दूर राहिलेले आहेत. या योगमार्गाचा आणि आरोग्याचा फार निकटचा संबंध आहे. सध्या रोगांकडे अत्यंत स्थूल स्वरूपात पाहण्याची सवय लागली आहे. जोपर्यंत रोग दृश्य स्वरूपात म्हणजे, ताप, खोकला, सर्दी वगैरे लक्षणांनी व्यक्त होत नाही तोपर्यंत आपण त्याकडे लक्ष देत नाही. वास्तविक नंतर दृश्य स्वरूपात व्यक्त होणाऱ्या रोगांची सुरुवात अशी अव्यक्त मनोकायिक असंतुलनातूनच होत असते. अशा व्याधी स्थितीला योगशास्त्रात 'विक्षेप' अवस्थां म्हटले आहे. अशी 'विक्षेप' अवस्था जर सतत राहू लागली तर अखेरीस त्याचे रुपांतर दृश्य स्वरूपातील व्याधी म्हणजे रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह, सांधेदुखी, पचनाचे विकार, निद्रानाश, पाठदुखी अशा रोगांमध्ये होते. या रोगांचे जंतू नसतात, हे रोग जंतूमुळे होत नाहीत, तर मुख्यत्वे सततच्या मनोकायिक असंतुलित स्थितीमुळे होतात. म्हणून योग, आरोग्य, व्याधी किंवा रोग यांचा अन्योन्य संबंध आहे.

'शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्तरावरील सुस्थिर स्थिती म्हणजे आरोग्य होय.' (A jubilent feeling of well being at physical and social level is defined as Health,)

आरोग्याची व्याप्ती ही शारीरिक स्तर किंवा जंतू यापर्यंतच मर्यादित नाही, तर त्याची व्याप्ती मानसिक स्थिती व सामाजिक संबंधापर्यंत पोहोचते हे स्पष्ट होते.

योगशास्त्रात शरीर आणि मन या दोहोंकडे पहाण्याचा दृष्टिकोन हा वस्तुनिष्ठ आहे. म्हणून योग साधनेचा उद्देश विशद करताना पतंजली सूत्रात म्हटले आहे.

योग : चित्तवृत्ति निरोधः ।

चित्त (मन) याचा निरोध (नियमन) म्हणजे योग. चित्तनियमनानेच मानसिक आरोग्य वृद्धिंगत होते. आपल्या संतुलित मनोकायिक स्थितीत असंतुलन निर्माण करणाऱ्या कारणास क्लेश असे म्हणतात. अर्थात अविद्या, अस्मिता, राग, द्वेष आणि अभिनिवेश हे पाच क्लेश होत. राग आणि द्वेष हे सर्व बेचैनी तणावाचे मूळ (Root) मानले जाते. राग उर्फ अनुराग म्हणजे एखादी वस्तू आवडली की त्याबद्दल एक प्रकारची आसक्ती वाटू लागणे, ती वस्तु आपली व्हावी, आपलीच असावी (मोह) अशी अपेक्षा निर्माण होणे, - होय. आज माणसाची अशी समजूत झाली आहे की, सुख आणि सुरक्षितता ही 'वस्तू' मध्ये आहे. वस्तु पैशांनी खरेदी करता येते, म्हणून सुख हे पैशात आहे. तेव्हा कसेही करून पैसे मिळवावे. हे पैसे मिळविण्याचे मार्ग मग चांगले असोत वा वाईट व म्हणूनच त्यातून बेचैनी, मानसिक तणाव निर्माण होतो.

यौगिक क्रियांमधील आसन, प्राणायम, शुद्धिक्रिया यांचा परिणाम शरीरातील मज्जासंस्था, स्नायु-ग्रंथी यांची कार्यक्षमता सुधारण्यावर होतो. तसेच त्यांना 'नाडी-शुद्धी' म्हणजे शरीरातील नसा (मज्जातंतू), आतडी, श्वसननलिका, रोहिण्या, नी लस वाहिन्या (Lymphatic) या सर्व कार्यक्षम होण्यामध्ये होतो. वि आसनांचा परिणाम हा मणक्याची लवचिकता व सांध्याचा खुलेपणा, स्ना ताणन क्षमता, तर प्राणायामचा परिणाम हा रक्ताभिसरण सुधारण्याध्ये व विशेष करून मनशुद्धी होण्यामध्ये होते.

योगासने आणि प्राणायाम करण्याच्या पद्धतीमध्ये शरीराच्या सर्व आव हालचाली या पूर्ण सजगतेने आणि सुनियंत्रित पद्धतीने करण्याच्या पद्धती विशेषतः स्नायूसंस्था आणि मज्जासंस्था यांचेमध्ये उत्तम सहकार्य आणि सं निर्माण होण्यात होते. याचा परिणाम शरीरातील कंप कमी होण्यासाठी आ लहान लहान सर्व कार्ये कुशलतेने करण्यासाठी आपोआप मदत होऊ ला ध्यानसाधना ही मन स्थिर होण्यास व मनाचे निर्मलीकरण होण्यास सहाय्य ठरते. त्यामुळे मनःशांती प्राप्त होते व त्यामुळे जीवनाकडे बघण्याचा वस्तु दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होते. यम - नियमांचे जाणीवपूर्वक पा करण्याने सामाजिक जीवनात परस्पर सहकार्य, मैत्रीभाव प्रेम निर्माण हो संघर्ष, मत्सर, द्वेष नाहीसा होतो. योगास युक्त आहाराची, विश्रांतीची स ही मिळते. तसेच ध्यानापासून मनःशांती होते. तसेच व्यसनापासून व्य आपोआप अलिप्त होते. वरील सर्व फायदे आपणास योगाच्या अष्टांगयो (राजयोग) मुळे प्राप्त होऊ शकतात. त्यामध्ये, यम, नियम, आसन, प्राणाया प्रत्याहार धारणा, ध्यान, समाधि ह्यांचा समावेश होतो.

बेचैनी उर्फ मानसिक तणावापासून जर खरोखर मुक्त व्हावयाचे अ तर विकारयुक्त मनाचे निर्मलीकरण झाले पाहिजे व हे काम फक्त ती व्यक्ती स्वप्रयत्नानेच करू शकते. म्हणून विकाररूपी घाणीने बरबटले मन स्वच्छ करावयास सहजगतास्थिती साबण फार उपयोगी पडतो.

इवलेसे रोप लावियेले द्वारी ।
तयाचा वेलू गेला गगनावरी
मोगरा फुलला, मोगरा फुलला ।
फुले वेचिता अति बहरू कळीयासी आली ॥
मनाचिये मनी गुंफियेला शेला ।
बापरखुमादेविवरु विठ्ठले अर्पिला ॥

✤ ✤ ✤ ✤

इमारती किंवा पैसा म्हणजे संस्था नव्हे, त्यातील निःस्वार्थी कार्यकर्ते म्हणजे संस्था होय. त्यांच्या बळावरच ती टिकून राहते - वाढते

- प. पू. एलाचार्य



# लोकसंख्या वाढ रोखलीच पाहिजे

**मिलिंद संगई**
**एम.कॉम.प्रथम वर्ष**



आज भारताची लोकसंख्या ८५ कोटीच्या घरात गेली आहे. २००१ सालात ह्याच लोकसंख्येचा आकडा एक अब्ज इतका होईल. एवढ्या प्रचंड लोकसंख्येला राहण्याकरिता घरे, खायला अन्न व इतर मूलभूत सेवासुविधा पुरविणे केवळ अशक्य आहे. पन्नास वर्षापूर्वी र. धों. कर्वे यांनी कुटुंब नियोजनाचा पुरस्कार करण्याचा प्रयत्न केला पण त्या वेळेसच्या धर्ममार्तंडांनी त्यांना वेड्यात काढले होते. पण आज त्यांनी व्यक्त केलेले विचार सर्वांनाच पटतात. आज जागतिक क्रमवारीत भारत दुसऱ्या स्थानावर आहे. पण काही दिवसात आपण पहिल्या क्रमांकावर जाऊ यात शंका नाही. कारण चीनने ज्या कठोरपणे कुटुंबनियोजनाच्या योजना अंमलात आणल्या आहेत. त्यावरून तो देश लोकसंख्या काही प्रमाणात कमी करण्यात नक्कीच यशस्वी झालेला आहे. भारतात देखील त्यांच्याइतकी कठोरपणे ह्या योजना राबवायचा हव्यात तरच आपण ह्या समस्येला काही प्रमाणात तोंड देऊ शकू.

आज भारतापुढे ज्या काही समस्या आहेत त्या सर्व समस्येचे मूळ केवळ लोकसंख्यावाढ या एकाच घटकात एकवटलेले आहे म्हणूनच आज तज्ज्ञ सरकारला फक्त एकच सल्ला देत आहेत की इतर कोणत्याही योजनेवर पैसा खर्च करता त्यापेक्षा कुटुंबनियोजनावर जास्त पैसा खर्च करा. बेरोजगारी वाढ, आर्थिक विषमता, जागेची टंचाई अन्नधान्याचा तुटवडा, प्रचंड दारिद्र्य महागाई, जागतिक पातळीवर खालावलेली पत, तुटीची अर्थव्यवस्था, एक ना हजार समस्या आज आपल्यापुढे 'आ' वासून उभ्या ठाकलेल्या आहेत. कोणतीही समस्या घ्या आणि त्या समस्येचा 'लोकसंख्या कमी असती तर' या दृष्टिकोनातून विचार करा. उत्तर नक्कीच समाधानकारक मिळेल. पूर्वीच्या काळी योग्य वैद्यकीय सेवा सुविधा उपलब्ध नव्हत्या. मृत्यूचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर होते म्हणून मुलांची संख्या जास्त असायची. पण आजची परिस्थिती वेगळी आहे.

मृत्यूचे प्रमाण हे मोठ्या प्रमाणात घटले आहे. जननदर व मृत्यूदर यातील मोठी तफावत ही लोकसंख्या वाढीला कारणीभूत आहे. याबरोबरच शिक्षणाचा अभाव, रुढी व परंपराचा पगडा, अंधश्रद्धा मुला-मुलीत केला जाणारा भेद ही प्रमुख कारणे देखील लोकसंख्या वाढीस कारणीभूत आहेत. लोकसंख्या कमी करण्यासाठी शासन शासकीय पातळीवरून मोठ्या प्रमाणात

प्रसंग एका दवाखान्यातील. एक बाई (बाई कुठली २७-२८ वर्षाचे वय असणारी तरुणी केवळ चार मुलींची आई म्हणून तिला बाई म्हणायचे) आपल्या पाचव्या बाळंतपणासाठी डॉक्टरांकडे आली होती. डॉक्टरांनी तपासणी करतांना सांगितले की, बाई आता ह्या वेळेस मात्र तुम्ही ऑपरेशन करून घ्या तुमच्या जीवाला धोका होईल. बाई मात्र गप्प. जेव्हा डॉक्टरांनी खोदून विचारले तेव्हा ती म्हणाली नवऱ्याला मुलगा हवाय. डॉक्टर म्हणाले, 'अहो बाई आता काळ बदललाय. मुला-मुलीत फरक करीत नाही आता 'पण हे तत्त्वज्ञान तिच्या अडाणी नवऱ्याच्या डोक्याबाहेरचे होते. शेवटी डॉक्टर म्हणाले, 'ह्या वेळेस तुम्ही ऑपरेशन करून घेणार असाल तरच मी ही केस दाखल करून घेतो कारण मी माणूस आहे, सैतान नाही'. प्रसंग मोठा हृदयद्रावक होता. जवळ जवळ सर्वच ठिकाणी घडणारा. कुटुंब नियोजनाचे महत्त्व हे त्या जोडप्याला पटत नव्हते, त्यांना केवळ वंशाचा दिवा हवा होता, वंश पुढे चालविणारा एक घटक हवा होता.

प्रयत्न करीत आहेच, पण केवळ कुटुंबनियोजन ही शासनाचीच जबाबदारी आहे का ? महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींची यातील भूमिका काहीच नाही का ?

खरे तर कुटुंबनियोजन आणि महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी यांचा सर्वात जवळचा संबंध आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. कारण आजचे हे विद्यार्थी-विद्यार्थिनी उद्याचे माता-पिता असतात, त्यामुळे कुटुंबनियोजनाचे महत्त्व या युवकांना पटवून देणे हे सर्वात महत्त्वाचे आहे. शासन आज सर्वच क्षेत्रातील अभ्यासक्रमांची पुनर्रचना करीत आहे. शिक्षणाचे स्वरूप बदलून ते बाहेरील व्यावसायिक क्षेत्राशी निगडित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण देशापुढील जी सर्वात महत्त्वाची समस्या आहे ती म्हणजे लोकसंख्या. या समस्येशी निगडित एखादा विषय सुरू केला पाहिजे व तो सर्व क्षेत्रात सक्तीचाच असावा. केवळ लैंगिक शिक्षण सुरु केल्याचे ह्या विषयाची गरज भागेल असे वाटत नाही. लैंगिक शिक्षण देण्यामागचा उद्देश ह्यातील भीती व गैरसमज दूर करणे हा आहे.पण त्याबरोबर लोकसंख्यावाढ ही देशाला किती हानिकारक आहे, देशाला केवळ लोकसंख्येमुळे ज्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे त्याचा उहापोह ह्या विषयामध्ये घडवून आणला पाहिजे.

महाविद्यालयीन युवक व कुटुंब नियोजन यांचे अतूट संबंध आहेत. महाविद्यालयीन युवकांना ह्या विषयावरील उद्बोधक पुस्तके, व्हिडीओ कॅसेट, परिसंवाद, चर्चासत्रे आयोजित करून कुटुंबनियोजनाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. देश आज अत्यंत कठीण स्थितीतून जात आहे व जागतिक बँकेच्या अहवालानुसार २००१ सालापर्यंत भारताची लोकसंख्या २ अब्जाच्या घरात जाईल व त्यावेळेस भारतीय अर्थव्यवस्था ही भयानक असेल २००१ सालात भारताची अर्थव्यवस्ता ही एवढी कमकुवत झालेली असेल की कोणताही देश किंवा जागतिक बँक देखील भारताला अर्थपुरवठा करणार नाही. देश पूर्णपणे कर्जबाजारी झालेला असेल व आर्थिकदृष्ट्या भारताच्या नाड्या ह्या परकीयांच्या हातात गेलेल्या असतील. महागाई गगनाला भिडलेली असेल, बेरोजगारी जवळ जवळ ३० पट वाढेल, गुन्हेगारी प्रचंड प्रमाणात वाढेल, राहणीमान खालावेल. पर्यायाने जगणेच अवघड होऊन जाईल. हे अहवाल ती स्थिती दर्शवितात ती पाहिल्यानंतर कुणाही महाविद्यालयीन तरुणाच्या मनामध्ये एकच प्रश्न उभा राहील की या स्थितीपासून देशाला वाचविण्यासाठी काय उपाययोजना आहेत ? ही भयानक स्थिती आपण टाळू शकणार नाही का ?

या स्थितीला आपण नक्कीच टाळू शकतो. सर्व समस्यांवरील सर्वात महत्त्वाची उपाययोजना म्हणून कुटुंबनियोजनाकडे निर्देश करावा लागेल. आज आकाशवाणी व दूरदर्शनवरील अनेक कार्यक्रमातून व जाहिरातीतून त्याचे महत्त्व पटवून द्यायचा शासन प्रयत्न करते. पण ही केवळ शासनाची जबाबदारी नाही तर, सर्वसामान्य जनतेचीच जास्त आहे. मुख्यत्वेकरून महाविद्यालयीन युवकांची ही जबाबदारी आहे. केवळ त्यांनी स्वत:पुरतीच ही जबाबदारी मर्यादित न ठेवता जे लोक शिक्षण घेऊ शकत नाही अशा युवक युवतींना देखील कुटुंबनियोजन वैयक्तिक व देशाच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहे हे पटवून दिले पाहिजे. आज विद्यार्थिनींना देखील महाविद्यालयीन शिक्षण मिळत आहे व त्यांनी देखील या योजनेचे महत्त्व ज्या युवती ह्या शिक्षणापासून वंचित रहातात, त्यांनाही या योजनेचे महत्त्व पटवून दिले पाहिजे जे विद्याथी-विद्यार्थिनी साक्षरता प्रसाराचे काम करतात त्यांनी कुटुंबनियोजनाचे महत्त्व सर्वांना पटवून द्यायला हवे.

खरेतर आज शासनाने कुटुंबनियोजनाला पंचवार्षिक योजनेत सामाविष्ट केलेले आहे. अर्थसंकल्पात या योजनेवर होणारी तरतूद ही अत्यल्प आहे. जनतेने या योजनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे. ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. कायदे करण्यात सरकारला अपयश आलेले आहे हे 'शहाबानो' प्रकरणानंतर दिसून आले आहे. पण तरीही या योजनेबाबत भवितव्याच्या दृष्टीने काही कायदे कडकपणे अंमलात आणले पाहिजेत. लोकसंख्या कमी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने जी समिती नेमली आहे त्या समितीने खालीलप्रमाणे शिफारसी केलेल्या आहेत. (राज्य नियोजन मंडळाची लोकसंख्या समिती)



१. दोनहून अधिक मुले असणाऱ्यांना कुठलीही निवडणूक लढविण्यास बंदी करावी.

२. मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा १८ वरून २१ वर्षेपर्यंत करण्यात यावी.

याशिवाय या समितीने काही प्रोत्साहन व अप्रोत्साहन उपाय सुचविले आहे. प्रोत्साहन उपायांमध्ये नसबंदी शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यांना शंभर ऐवजी पाचशे रुपये दिले जावेत, एक मुलगी असतांना शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यांना दहा हजार रुपयाची तर दोन मुलींनंतर शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यांना साडेसात हजार रु. ची. अल्पबचत प्रमाणपत्रे द्यावीत, दारिद्रेषेखालील व्यक्तीने एक अपत्यानंतर शस्त्रक्रिया केल्यास त्यांचा पन्नास हजार रुपयांचा विमा उतरवून सर्व हप्ते सरकारने एक रकमी भरावी. ही रक्कम संबंधित जोडप्याला मिळावी, अशी तरतूद आहे. अप्रोत्साहक उपायांमध्ये सार्वजनिक, खाजगी, सरकारी निमसरकारी क्षेत्रात नोकरी मिळवू इच्छिणाऱ्यांकडून दोनपेक्षा जास्त मुले होऊ देणार नाही अशी लेखी कबूली घ्यावी, अशा दांपत्यास तिसरे मूल झाले तर संबंधित व्यक्तीची नेमणूक ताबडतोब रद्द करावी. राष्ट्रीयकृत, व्यापारी, सहकारी बँकाकडून देण्यात येणारी कर्जे, अनुदान, भाडे नियंत्रण कायद्याचे संरक्षण तसेच सहकारी, खाजगी, सरकारी गृहनिर्माण संस्थांना मिळणाऱ्या सरकारी सवलती व कर्जे, गुमास्ता कायदा, कारखाने व उद्योगधंदे याबद्दलचे परवाने, दूरध्वनी, गॅस, रेशनकार्ड, नोकरीतील सवलती काढून घ्याव्यात. या शिफारसी सुचवितांना त्यांनी हेही सुचविले आहे की १९ ते २९ या वयोगटातील जोडप्यांवर अधिक भर द्यावा. लोकसंख्यावाढीचे प्रमाण १९६१-७१ मध्ये २७.४५ टक्के १९७१-८१ मध्ये २४.५४ टक्के आणि १९८१-९१ मध्ये २५.२६ टक्के असे होते. देशातील लोकसंख्या वाढीचे प्रमाण २३.५० टक्के आहे व हे भीषण आहे म्हणून या समितीने तातडीने उपाययोजना करण्याची सरकारला शिफारस केलेली आहे.

लोकसंख्यावाढीमुळे निर्माण होणारी परिस्थिती ही इतकी भीषण आहे की, भावी पिढी तिला सामोरी जातांना नष्ट होण्याची भीती आहे. लोकसंख्या समितीने केलेल्या शिफारशी ह्या सरकारने लागू केलेल्या नाहीत. केवळ जनतेची मते आजमाविण्याकरिता जाहीर केलेल्या आहेत. याठिकाणी एकच मुद्दा नमूद करावासा वाटतो की, भाववाढ ज्यापद्धतीने जनतेवर लादते त्याच कठोरपणे ह्या शिफारशीदेखील अंमलात आणाव्यात. आवश्यक तिथे कायद्यात दुरुस्ती केली पाहिजे. सरकार ज्याप्रमाणे आर्थिक निर्णय किंवा रुपयाचे अवमूल्यन कठोरपणे अंमलात आणते त्याचप्रमाणे ह्यावरील शिफारशीदेखील कितीही विरोध झाला तरी कोणत्याही परिस्थितीतून लागू केल्याच पाहिजेत.

प्रसिद्ध उद्योगपती श्री.जे.आर. डी. टाटा यांनी भारतीय वाढत्या लोकसंख्येचे वर्णन मोठ्या मार्मिक शब्दात केलेले आहे. ते म्हणतात की ''दरवर्षी भारताची लोकसंख्या ही १ कोटी ७० लाखाने वाढते याचाच अर्थ दरवर्षी एक ऑस्ट्रेलिया खंड भारतात जन्माला येत असते'' या दोन वाक्यावरून लोकसंख्येचा राक्षस आ वासतो आहे हे स्पष्ट जाणवते व या राक्षसाला वेळीच आवर घातला नाही तर हा संपूर्ण भारताला गिळून टाकल्याशिवाय राहणार नाही.

✤ ✤ ✤ ✤

१. शिक्षणास प्रारंभ असतो. पण शेवट नसतो. जन्मभर शहाणा मनुष्य शिकत असतो. शिकायला तयार असतो.

**- अर्नोल्ड बेनेट**

२. खरे बौद्धिक शिक्षण म्हणजे नव्या घटना किंवा नवनव्या वस्तुमानांची नुसती माहिती करून घेणे नव्हे, तर त्यांचे जीवनातील स्थान समजून घेऊन त्यांचा उपयोग करण्यास शिकणे हे होय.

**- ओ. डब्ल्यू. होल्मस**

३. जो शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर करतो व त्याची जोपासना करतो, तोच चांगले शिक्षण देऊ शकतो.

**- इमर्सन**

४. ज्याला आपले ज्ञान दुसऱ्यास पोचवता येते, समजावून सांगता येते, तो खरा शिक्षक व जो शिक्षकाने दिलेले ज्ञान आत्मसात करू शकतो तो खरा विद्यार्थी

**- इमर्सन**

# महाराष्ट्रातील फळ लागवड
## एक महत्त्वाकांक्षी योजना

राजू पाठक, एम.ए. (अर्थशास्त्र)



**प्रास्ताविक -**

आदिमानवाचे सर्वात प्रथम अन्न फळे हेच होते. बायबल मधील ॲडम व ईव्ह आणि त्याचे सफरचंद ही गोष्ट तर सर्वांना परिचित आहेच. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात द्राक्षे व चरक-सुश्रुत संहितेत बोरे, आवळा, अंजीर व बेल यांचा उल्लेख आढळतो. तसेच मोगलकाळात ऐन-ए-अकबरीत 'आंबा व सीताफळ' ह्या फळांचा प्रामुख्याने उल्लेख केलेला दिसून आलेला आहे.

पूर्वीच्या काळी फळ देवाला चढविण्यासाठी व श्रीमंतांच्या आहारातील चैनीचा पदार्थ म्हणून मानला जात असे. त्यामुळे फळाची लागवड मर्यादित व ठराविक ठिकाणी होत असे. परंतु सध्या फळांची लागवड झपाट्याने वाढली असून आरोग्याकरिता समतोल आहारात वैद्यकीयदृष्ट्या फळांचे महत्त्व अनन्य साधारण म्हणून गणले जात आहे.

**भारताचा शेती व औद्योगिक विकास :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताचे फळ-लागवडीखालील एकूण क्षेत्र बारा लाख हेक्टर आहे. फळांचे एकूण वार्षिक उत्पादन ७४ लाख मेट्रिक टन इतके आहे. जागतिक फळ उत्पादनात भारताचा तिसरा क्रमांक लागतो. जगातील फळ उत्पादनात भारताचा वाटा ८ टक्के आहे. भारताचा नैसर्गिक अनुकूल परिस्थिती आहे. त्यामुळे फळ-लागवड व विकास होऊन निर्यातीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या फळ निर्यातीपासून आवश्यक परकीय चलन मिळविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे. कृषिविकासाबरोबर औद्योगिक विकास महत्त्वाचा आहे. फळांची लागवड मोठ्या प्रमाणात होऊ लागली की, त्यावर अवलंबून असणारे पूरक उद्योग सुरू होतील. उदा. फळ प्रक्रिया, तेल, हवाबंद डब्यात रस, शीतगृहे इत्यादींना चालना मिळते. बेरोजगारांना रोजगार मिळतो व औद्योगिक प्रगती घडून येते. फळनिर्यातीपासून देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळते व आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होते. सरकारला फलोत्पादनाचे महत्त्व पटले आहे. फलोत्पादन जास्तीत जास्त होण्यासाठी लहान व मोठ्या शेतकऱ्यांना मदत व मार्गदर्शन करते. फलोत्पादन कार्यक्रमाचा विस्तार व विकास करण्यास बँकांचाही सिंहाचा वाटा आहे. त्याचबरोबर सरकारच्या विकास कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सहकार महर्षी व छोटे मोठे शेतकरी यांचेही महत्त्वाचे योगदान आहे.

**महाराष्ट्रातील शेती व फळलागवडीची स्थिती :**

महाराष्ट्राला निसर्गतः फलोत्पादनाचे वरदान लाभले आहे. महाराष्ट्राचे एकूण प्रकृतिमान पहाता महाराष्ट्रात फळ लागवडीस भरपूर वाव आहे. जमिनीची उपलब्धता व पर्जन्यमान यामुळे महाराष्ट्राला फळ संपन्न राज्य म्हटले जाते. महाराष्ट्रात एकूण १८१ लाख हेक्टर क्षेत्र कृषी लागवडीखाली आहे. त्यापैकी ५ लाख ८५ हजार हेक्टर क्षेत्र फलोत्पादन व भाजीपाला याखाली येतो. फळ पिकासाठी २ लाख ४२ हजार हेक्टर क्षेत्र आहे. हे क्षेत्र अत्यल्प आहे. महाराष्ट्र राज्यात २९ लाख हेवटर लागवडी योग्य पडीक जमिनीवर फलोत्पादनास फार वाव आहे.

**फळ निर्यातीत असणारा वाव :**

महाराष्ट्रात सतरा-अठरा प्रकारच्या फळझाडांची लागवड व्यापारी दृष्ट्या केली जाते. काही ठिकाणे विशिष्ट फळांसाठी प्रसिद्ध पावली आहेत. उदा. कोकणात आंबा, नागपूर - संत्री, नाशिक - द्राक्षे, खानदेश - बोरे,



दौलताबाद - सिताफळे, सासवड - अंजिरे, व पालघर - चिक्कू, ही सर्व फळे त्या त्या प्रदेशातून निर्यात होतात. कारण त्या फळांमध्ये उत्तम गुण व दर्जा असतो. त्यामुळे परदेशात त्यांना भरपूर मागणी असते. पुणे, मुंबई येथील मोठे व्यापारी बाजारात आलेल्या फळांमधून उत्तम प्रतीची फळे विकत घेतात व तेथे परदेशी निर्यात करतात. फळांच्या निर्यातीत महाराष्ट्राला प्रचंड वाव आहे. निर्यात वाढ होणे हे आपल्यापुढे आव्हान आहे. कारण निर्यात वाढ होणेमुळे आपल्याला परकीय चलन मिळते. आज परकीय चलन पेच प्रसंगातून मार्ग काढण्यासाठी ४० हजार कोटी रुपयांच्या फळांची निर्यात महाराष्ट्र करू शकतो. आज फळांची निर्यात दोन हजार आठशे कोटी रुपयांची होते. ती १९९५ अखेर पंधराहजार आठशे कोटी रुपयांवर जाईल असा अंदाज 'असोकेम' या संस्थेने व्यक्त केला आहे.

**महाराष्ट्र शासनाची महत्त्वाकांक्षी फळलागवड योजना - रोजगार हमी योजनेतून फळलागवड :**

ग्रामीण भागातील शेतीचा अन्नधान्य उत्पादन हा पाया न ठेवता फलोत्पादनाकडे त्याची वाटचाल व्हावी, बेरोजगारांना, आदिवासी भागातील शेतकऱ्यांना रोजगार मिळावा हा उद्देश होता व शहरी औद्योगिकरणावर पडणारा भार सुद्धा कमी व्हावा ह्याचा विचार मा. ना. मुख्यमंत्री शरद पवार यांनी रोजगार हमी योजना फलोत्पादनासाठी उपयोगात आणण्याचे ठरविले. १९९०-९१ पासून ह्या योजनेचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरू करण्यात आला. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवून आणण्यात फलोत्पादन कार्यक्रमाला मोठे यश लाभले आहे.

**ठिबक सिंचन योजना :**

फळ पिकांसाठी बरीच वर्ष पाण्याची आवश्यकता लागते. पाण्याचे प्रमाण कमी जास्त झाल्यास उत्पादनावर परिणाम होतो. त्यासाठी फळझाडांना योग्य प्रमाणात व मर्यादित पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन योजना कार्यान्वित करण्याचे ठरले. ठिबक सिंचन योजनेमुळे कमीत कमी पाण्याचा वापर होऊन जास्तीत जास्त उत्पादन घेण्यात येते. रोपवाटिका व बागांवर ठिबक सिंचन योजना कार्यान्वित करण्याचे प्रयत्न आहेत.

बारामती कृषि-विकास प्रतिष्ठान या संस्थेने ठिबक सिंचन योजना राबवून पाण्याचे नियोजन सूत्रबद्ध पद्धतीने केले आहे. मा. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी पाण्याचे नियोजन व त्याचा पिकावर होणारा परिणाम व उत्पादन वाढ यासाठी केलेले प्रयोग यशस्वी झाले आहेत. महाराष्ट्र बागवानी बोर्डातून पुरस्कृत केलेल्या योजनेअंतर्गत ३० ग्रीन हाऊसचा प्रायोगिक अभ्यास शासकीय फळरोपवाटिकांवर करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य हे राष्ट्रीय पातळीवर ठिबक-सिंचन योजनेची अंमलबजावणी करण्यात अग्रेसर राज्य आहे.

**कोल्हे समितीचा अहवाल :**

महाराष्ट्र राज्यातील फळ भाजीपाला इ. कृषि उत्पादनावर आधारित प्रक्रिया केंद्रे उभारणे, बाजारपेठा उपलब्ध करून देणे यासाठी कृषि विद्यापीठ नेहमीच प्रयत्नशील रहाते. खाजगी उद्योजकांच्या सहकार्याने शेतकऱ्यांना उत्तम बी-बियाणे, खते, कलमे-रोपे यांचा पुरवठा करण्यात यावा असे कोल्हे समितीने सुचविले. महाराष्ट्र सरकारने १० लाख कलमे व २१० लाख रोपे तयार करणाऱ्या ६९ रोपवाटिका तयार कराव्यात. २२ जिल्ह्यात फळ प्रक्रिया केंद्रे उभारण्यात यावीत, असे समितीने सुचविले. म्हैसूरच्या सी.एफ.टी.आर.आय. या संस्थेने केलेल्या पहाणीनुसार महाराष्ट्रात १९५ प्रक्रिया युनिट चालू शकतील.

**वाढते फलोत्पादन : समस्या**

महाराष्ट्र सरकारच्या वरील महत्त्वाकांक्षी योजना, वाढते तंत्रज्ञान, नवीन शोध, औषधे, ह्यामुळे फळांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ लागले आहे. फलोत्पादन योजनेपासून १९९०-९१ या वर्षाच्या कार्यक्रमाची व्याप्ती व शेतकऱ्यांचा उत्साह यामुळे महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या फळाखाली ८४ हेक्टर क्षेत्र आणण्यात आले. २० ते २५ वर्षात फलोत्पादन उत्पादनात महाराष्ट्र राज्य एक अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाईल. मोठ्या प्रमाणात फळ लागवड करून फलोत्पादन वाढेलही पण वाढलेल्या उत्पादनाची विक्री कोठे करावयाची हा मोठा प्रश्न निर्माण होईल. त्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळणे आवश्यक आहे. भविष्यात हा प्रश्न प्रामुख्याने जाणवणार आहे. यासाठी आवश्यक विक्री व्यवस्था, अद्यावत शीतगृहे, साठवणूक गृहे, पॅकेजिंग, वाहतूक सोई, यांचा विचार करावा लागेल. महाराष्ट्र शासनास त्या दृष्टीने

पावले उचलणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळविणे, निर्यात वाढविणे या प्रयत्नात सरकार यशस्वी झाले तरी काही महत्वाच्या अडचणी निर्माण होतात.

**फळ निर्यातीत येणाऱ्या अडचणी :**

१. **दर्जा** - आपण फलोत्पादन करतो व निर्यात देखील करतो. परंतु जागतिक बाजार पेठेत लागणारा उच्च दर्जा अथवा प्रक्रियायुक्त माल निर्माण करण्यात भारतीय शेतकरी कमी पडला आहे. त्यामुळे परदेशी ग्राहक भारतीय मालाची मागणी करीत नाहीत. उदा. आपल्या आंब्याला जपानमध्ये खूप मागणी आहे. परंतु व्हेपर हीट ट्रिटमेंट सुविधा नसल्यामुळे आंब्याची मागणी करण्यास जपान तयार नाही.

२. **वाहतूक** - फळाचे उत्पादन झाले पण त्यासाठी लागणाऱ्या वाहतुकीच्या सोयी, महत्वाच्या आहेत, कारण फळे ही नाशवंत असल्यामुळे त्यासाठी वाहतूक व दळणवळणाच्या सोई वाढविणे आवश्यक आहे. वाहतुकीसाठी देणारा खर्च कमी करावा, कारण शेतकऱ्याला फळ उत्पादन करतांना वाहतूक खर्च परवडणे आवश्[यक] आहे.

३. **शीतगृहाच्या सोई** - फळे ही नाशवंत वस्तू आहे. फळांना दीर्घका[ळ] टिकविण्यासाठी शीतगृहे आवश्यक असतात. महाराष्ट्र राज्यात शीतगृहे त्यांची क्षमता वाढविणे खूपच आवश्यक आहे. शीतगृहांच्या सोईअभा[वी] दरवर्षी तीन हजार कोटी रुपयांचा फळ भाजीपाला नाश पावतो.

४. **जमीन** - कमाल जमीन धारण कायद्याने धारणक्षेत्रे लहान आकारा[ची] झाली, त्यामुळे यंत्र, तंत्राचा वापर करणे आवश्यक झाले आहे. त्यामु[ळे] उत्पादकतेत घट होते. लहान आकाराच्या जमिनीत उत्पादन मागणीच्या प्रमाणा[त] वाढत नाही.

५. **शेतकऱ्यांचे अज्ञान** - परंपरागत पद्धतीने भारतीय शेतकरी शेती करतो[.] अशिक्षितपणामुळे सुधारित यंत्रे, औषधे ह्यांचा फळ उत्पादनात वापर केल[ा] जात नाही. रोगराई व नैसर्गिक आपत्ती या कारणाने फळ उत्पादन क[मी] होते व फळांचा दर्जा घसरतो.

फळ निर्यात करण्यात जरी अडचणी असल्या तरी महाराष्ट्र शासनाने या अडचणींवर मात केली आहे. शेतकऱ्यांनी फळलागवडीत व फलोत्पादनात जी प्रगती केली आहे, ती खरोखर स्तुत्य आहे. महाराष्ट्र शासनाने आपल्[या] ज्या महत्त्वाकांक्षी योजना राबविल्या. त्या यशस्वी केल्या आहेत. फ[ळ] उत्पादनात महाराष्ट्र नेहमीच आघाडीवर आहे व भविष्यात नेहमीच आघाडीव[र] राहील.

✤ ✤ ✤ ✤

१. शेकडो थोर विचार, भावना व आकांक्षा मनात बाळगण्यापेक्षा एकच सत्कृत्य आपल्या आपल्या हातून झाले तर त्याचे मूल्य अधिक आहे.

**- जे. आर. लोवेल**

२. आपल्याला होणाऱ्या दुःखाकडे त्रयस्थपणाने पाहून नंतर त्याचे वर्णन जो करू शकतो तो खरा जन्मजात साहित्यिक होय.

**- एडवर्ड बोरडेट**

३. आपल्याला वाटते की शिक्षक करतो तो बलवान परंतु खरा बलवान तोच की जो दुसऱ्याची चूक झाली तरी त्याला क्षमा करून कायमचा आपला करतो.

**- आर. पी. अली**

४. सच्चरित्र व्यक्तीच्या साध्या बोलण्यावरही एखाद्[या] लबाड मनुष्याने घेतलेल्या शपथेपेक्षा निर्धास्तपणे विश्वास ठेवावा.

**- सॉलन**

५. ज्याला सुख व समाधान अगदी साध्या व बिनखर्चाच्या गोष्टीमधून मिळवता येतात, तोच सर्वात श्रीमंत होय. कारण त्या गोष्टी सगळीकडे व नेहमीच व विपुल प्रमाणात मिळतात.

**- थारो**

✤ ✤ ✤ ✤



# मला धुंद, बेधुंद जीवन जगायचं ...

**महादेव भांडवलकर**
एम.कॉम.द्वितीय वर्ष



जागतिक साक्षरता दिन ९ सप्टेंबरला साजरा केला जातो. मानवी हक्क दिन १० डिसेंबरला साजरा केला जातो आणि २१ मार्चला वनदिन साजरा केला जातो. अगदी अशाच प्रकारे ५ जूनला आपण जागतिक पर्यावरण दिन साजरा करतो. आज प्रत्येक क्षेत्राचे दिन साजरे करण्याची वेळ आली आहे.

गाण्यांमधून, चित्रपटांमधून, कादंबऱ्यामधून आपण झाडांबद्दल वर्णन ऐकतो, वाचतो. पण वास्तवता मात्र खूपच विचित्र आहे. ही विचित्र अवस्था नष्ट करण्यासाठी पर्यावरण संवर्धन व जपणुकीच्या कार्यात वाहून घेतलेल्या 'वनराई' या संस्थेसारख्या अनेक संस्था आपल्या देशात निर्माण होण्याची आज खरी गरज आहे.

सर्वाधिक क्षेत्र जंगलाखाली गडचिरोली या जिल्ह्याचे आहे. इतर जिल्ह्यांनीही या गडचिरोली जिल्ह्याचे अनुकरण करावे. याशिवाय आजचा पर्यावरणाचा प्रश्न सुटू शकणार नाही.

निसर्गरम्य वातावरणातील मस्त आनंद लुटायचा असेल, झुळझुळणाऱ्या निर्मळ झऱ्याचे पाणी प्यायचे असेल, अंगाला झोंबणाऱ्या गार वाऱ्यात मस्त भटकायचे असेल, झाडांच्या पानांची सळसळ ऐकायची असेल तर हिरव्यागार लांबरुंद जंगलांची, दाट झाडांची लागवड व जोपासना करायला पाहिजे.

सतत वाढत्या लोकसंख्येच्या सतत वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी जंगले क्रूरपणे तोडली जात आहेत. त्यामुळे वायु प्रदूषण, जलप्रदुषण, ध्वनिप्रदूषण या सारख्या घातक समस्या उग्ररुप धारण करू लागल्या आहेत.

स्वतःच्या फायद्यासाठी ब्रिटीशांनी आपला देश कृषिप्रधान केला. या कृषिप्रधान देशात लोकसंख्येच्या दोन तृतीयांश भाग शेतीवर अवलंबून आहे. शेतीसाठी लागणारी अवजारे, घरे, सरपण, जनावरांचा चारा, खत व इतर कारणांसाठी झाडांची, जंगलांची तोड कित्येक वर्षे चालू आहे. झाड तोडल्यानंतर त्याच्या बदल्यात दुसरे झाड लावले पाहिजे. असा विचार मात्र कोणाच्याही ध्यानी येत नाही.

जमिनीची धूप थांबविणे, नद्यांच्या पुरावर नियंत्रण, पाणी पुरवठ्याच्या धरणात साचणारा गाळ थोपविणे, प्रदूषण तसेच वाऱ्यापासून होणारे जमिनीचे नुकसान, धुळीच्या वादळावर नियंत्रण राखणे, तसेच महत्वाचे म्हणजे निसर्गाचा समतोल राखणे, असे कित्येक फायदे वृक्षापासून मिळतात.

आपल्या देशात गणेशोत्सव साजरा केला जातो, नवरात्रोत्सव साजरा केला जातो. अशा वेळी अनेक देखावे दाखविले जातात. महाभारतातील, रामायणातील देखावे दाखविले जातात. अशाच माध्यमातून वृक्षांचे, जंगलांचे महत्त्व व फायदे कशा प्रकारचे आहेत हे देखावे किंवा अशा प्रकारची घोष वाक्य दाखविली जात नाहीत. देखावे, पहायला आलेल्या प्रत्येकाला त्या त्या मंडळाने एक रोप दिले तरी कित्येक वृक्षांची लागवड त्या वर्षभरात होईल. विविध कार्यक्रमांचा शुभारंभ वृक्षांची लागवड करूनच करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

आपल्या राज्यात २० टक्के जमिनीवर वृक्ष आहेत. तर साऱ्या देशात २२.७० टक्के जमिनीवर जंगले आहेत. समतोलपणा केव्हाही चांगलाच. तेव्हा निसर्गाचा समतोल साधण्यासाठी एक तृतीयांश जमिनीवर वृक्ष असणे

आवश्यक आहे. म्हणजे ३३ टक्के जमिनीवर जंगले असणे आवश्यक आहे. सध्या केंद्रसरकारने ३३ टक्के जमीन वृक्षाखाली आणण्याचा जो निर्णय घेतला आहे तो योग्य दिशेने अनुकूल आहे व त्याला आपणा सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. तरच तो निर्णय किंवा सरकारची वृक्ष मोहीम, यशस्वी होऊ शकेल.

रोप वाटिका, रोपवने तयार करणे, उजाड माळरानावर मोठ्या प्रमाणावर वृक्ष लावणे, जोपासणे व योग्य त्या जमिनीवर कुरणविकास करणे. विशेष म्हणजे जंगलामध्ये नवीन रस्ते तयार करणे व असलेल्या रस्त्यांमध्ये सुधारणा करणे. चोरटी वृक्ष तोड, आगीपासून बचाव, आगप्रतिबंधक योजना इत्यादी योजना प्रत्यक्षात आणणे व त्याचे रक्षण करणे हे सर्वांचे काम आहे असे मला वाटते.

तुळशीला आपण दररोज पाणी घालतो. अगदी तसेच एखादे झाड लावून त्याखाली दररोज पाणी घातले तर तो एक विशिष्ट आनंद आपल्या मनाला झाल्यावाचून राहणार नाही. आनंदी मन आनंदी वन निर्माण करीत असते.

जंगल लागवडीपासून आपण अनेक उद्योग करू शकतो. सध्या आंतरराष्ट्रीय बाजार पेठेत जंगलापासून निर्माण होणाऱ्या उत्पन्नाला मागणी आहे. कागद गिरणी आगपेट्या उद्योग इत्यादी उद्योग करून स्वतःचा व पर्यायाने देशाचा, समाजाचा आपण विकास करू शकतो.

परंतु वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपण झाडे व वन्यजीव मारल्यामुळे हळूहळू जंगलाचा व पर्यावरणाचा ऱ्हास होत राहील. मात्र त्याचे आज दुष्परिणाम आपल्याला जाणवू लागले आहेतत. जंगलाचा असाच ऱ्हास होत राहिला किंवा मला काय त्याचे मी एकटा काय करणार या भावनेत प्रत्येकजण जर राहिला तर दुष्परिणाम भयानक रूप धारण केल्याशिवाय राहणार नाही. एवढे मात्र खरे आहे.

आपल्याला जेवढं करणे शक्य आहे तेवढं आपण केलं तर नक्कीच त्याचे समाज अनुकरण करेल.

प्रामुख्याने वाढती आळशी लोकसंख्या, बघू पुढच्या पुढं म्हणणाऱ्यांची संख्या, औद्योगीकरण इ. कारणामुळे जंगलाचा ऱ्हास होत आहे.

''झाडे लावा झाडे जगवा' ही शासनाची मोहीम यशस्वी होण्यासाठी सातत्याने झाडे लावण्याची मोहीम हाती घेणे आवश्यक आहे. तसेच अभयारण्याची निर्मिती व जोपासना करणे महत्त्वाचे आहे. यासांठी समाज जागृती होणे आवश्यक आहे.

वृक्षापासून इंधन, इमारती लाकूड, चारा, फळे, डिंक, लाख, मध इत्यादी संपत्ती मिळविता येते. वृक्षांच्या लागवडीमुळे रोजगार प्रश्न सुटेल, असे मला वाटते. कारण आपण वरील संपत्तीची विक्री करून स्वतःचा चरितार्थ भागवू शकतो.

भारतीय संस्कृती काय सांगते की, जगा आणि जगू द्या. मी या ठिकाणी असे म्हणतो की, जगा आणि झाडे जगवा, अनं आनंदी व्हा.

संतांनी सुद्धा कित्येक वर्षापूर्वी झाडाचे, वृक्षाचे महत्त्व लिहून ठेवलेले आहे.

'वृक्ष वल्ली आम्हा सोयरे'.

असे संत तुकाराम एके ठिकाणी सहज म्हणून जातात. पण त्याचा मथितार्थ खूप खोल आहे.

'इवलेसे रोप लावियेले दारी'
'तयाचा वेलू गेला गगनावरी''

असं संत ज्ञानेश्वर म्हणतात.

'मस्त, धुंद, बेधुंद जीवन जगायचय ना ?' मग झाडे लावण्यात व झाडे जगवण्यात स्वतःच राष्ट्रप्रेम व्यक्त करा.

✤ ✤ ✤ ✤



# 'भक्तिपंथातील नामदेवरायांचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान

कु. हेंद्रे हेमा
बारावी वाणिज्य



ज्ञानेश्वरी ग्रंथ साराहुनी सार
फोडिले भांडार वैकुंठीचे
नामा म्हणे माझा ज्ञानराज प्राण,
तयांचे चरण वंदीन मी

महाराष्ट्राच्या संत परंपरेत ज्ञानदेवाप्रमाणे नामदेवरायांचे ही एक आगळेवेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. कोणीही कोणापेक्षा कमी नाही. प्रत्येकजण जवाहिऱ्याच्या दुकानातील पाचू, माणिक, मोती याप्रमाणे श्रेष्ठ आहेत. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी हे वारकरी संप्रदायातील एक वेगळे दर्शन आहे, तर नामदेवांचे लडिवाळ अभंग हे निराळे विश्वदर्शन घडविणारे आहे. वारकरी संप्रदायांचे भाग्यच एवढे थोर की नामदेव महाराज विस्तार करण्यात लाभले. महाराष्ट्राच्या बाहेर जाऊन भागवतधर्मीय भक्तिमार्ग, पंढरपूरचा वारकरी पंथ आणि श्री विठ्ठल दैवत यांची माहिती उत्तरेकडील लोकांना देणारे संत नामदेव हे पहिलेच संत होते. वारकरी संप्रदायाची प्रेमगंगा, ज्ञानगंगा यांनी पंजाबपर्यंत नेली. पंजाबात नामदेवरायांना 'भगवान नामदेव' म्हणतात. नामदेवांनी आपल्या कीर्तनाने पंढरीच्या या सगुण भक्तिमार्गाचा सर्वत्र प्रसार केला. ईश्वराच्या या सर्वत्र समतेचे ज्ञान लोकांना देऊन त्याच्या आधारे मानवामानवांत समता, दया, क्षमा, शांती यांचा प्रसार करण्याचे मनाशी योजून ते म्हणाले,

नाचू कीर्तना चेरंगी। ज्ञानदीप लावू जगी ।
सर्व सांडूनि माझाई । वाचे विठ्ठल रखुमाई ।

स्वतः नामदेवांनी नामसंकीर्तन भक्ती ही ज्ञानदीप प्रज्वलित करण्याचे साधन आहे, हे सांगितले आहे. अनेकांना नामस्मरण, भजन-कीर्तन हे भोळ्याभाबड्यांसाठी आहे असे वाटते. परंतु नामदेवांनी सामुहिक कीर्तनातून श्रोत्यांना नामाचा घोष करण्यास सांगितले आहे. भगवंतावर अंतःकरणापासून प्रेम करायला सांगितले आहे. आपण देव-देव करतो तो काही आशेपोटी किंवा भीतीपोटी, प्रेमात-भक्तीत भीती असताच कामा नये. परंतु, खरे सुख मिळवायचे असेल तर मानवाने स्वतःच्या मनावर ताबा मिळविला पाहिजे, विकारावर विजय मिळविला पाहिजे. नामदेवांनी त्यांच्या रसाळ अभंगवाणीतून आणखी एक दृष्टी दिली आहे ती म्हणजे देवाकडे आई म्हणून पाहण्याची ते म्हणतात,

''तू माझी माऊली मी हो तुझा तान्हा'

त्यांनी आयुष्यभर केलेले समाज प्रबोधनाचे समाजशुद्धीचे व सामाजिक समतेच्या व प्रेमाच्या प्रसाराचे हे कार्य केवळ अद्वितीय होय. नामाचे आणखी एक सामर्थ्य म्हणजे अज्ञानाचे बद्ध जीव मुक्त होतो. पण नामाने, मुक्त परमात्मा सुद्धा बद्ध होतो. या सामर्थ्याचे प्रमाण म्हणजेच नामदेवराय ।

वारकरी संप्रदायातील ज्ञानदेव व नामदेव हे दोन शब्द नीट समजून घेण्यासारखे आहेत. वारकरी संप्रदायात ज्ञान व नाम, ज्ञानदेव व नामदेव यांचे ऐक्य आहे. वारकरी संप्रदायाचे संत नामदेव महाराजांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी नामाला तत्त्व म्हटले आहे. अन्य पंथ संप्रदायात कोणी २१ व कोणी २४ तत्त्वे सांगितली आहेत. पण वारकरी संप्रदायाने 'एक तत्त्व नाम दृढ धरी मना' असे म्हटले आहे. पंढरपूर क्षेत्र आणि विठ्ठल यांच्याविषयी नामदेवांना अपार प्रेम होते. पांडुरंग क्षेत्रावाचून दुसरे आणिक क्षेत्र नाही. विठ्ठलाशी ज्याने सख्य केले ते पंढरीचे जन धन्य झाले.

"आधी रचिली पंढरी ।
मग वैकुंठ नगरी
जेव्हा नव्हते चराचर ।
तेव्हा होते पंढरपूर"

असे मोठ्या भाविकपणे नामदेवांनी वर्णन केले आहे. नामधारक भक्ताच्या भूमिकेवरून नामदेवांनी लोकांना जो उपदेश केला आहे तो प्रामुख्याने नामसंकीर्तनाचा केला. ईश्वराचे नाम वाणीने किंवा मनाने अखंड होणे ही सर्वांना सुलभ अशी भक्ती असल्यामुळे नामदेवांनी तिचाच प्रसार केला. ईश्वराचे नाम केव्हाही व कोणालाही घेता येते ते सांगतांना नामदेव म्हणतात.

काळवेळ नसे नामसंकीर्तन
उच्चनीच योनी हेही नसे ।
धरा नामकंठी सदासर्वकाळ ।
मग तो गोपाळ संभाळील ।
नामा म्हणे फार मोठे साधन ।
वाचे नाम घेणे इतुकेची ॥

नामदेवांनी 'देह जावो अथवा राहो, पांडुरंगी दृढ भाव' ठेवून त्याचे चरण न सोडण्याचा निश्चय केला. 'पंढरीचा वास चंद्रभागे स्नान आणिक दर्शन विठोबाचे' हेच मला जन्मोजन्मी मिळो अशी प्रार्थना केली. नामदेवांनी विठ्ठलभक्ती ईश्वरनिष्ठा व्यक्त करुन आपणहुन परमेश्वरापुढे देह, संसार सर्व अर्पण करून टाकले. त्यांनी केवळ भजनपूजनात वेळ न घालवता कीर्तनाच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे महान कार्य केले.

ज्ञानेश्वर नामदेवादि संतकवी हे मुख्यत: साक्षात्कारी संत होते. त्यांची काव्यरचना म्हणजे ईश्वरभक्तीचे एक साधनच । त्यांनी आपल्या भावानुभवांशी मिळत्याजुळत्या प्रतिमा उभारल्या आणि आपल्या प्रकट चिंतनाचा एक भाग म्हणूनच काव्याकडे पाहिले, ते म्हणतात,

'कोटी दिवाळ्यादसरे । आम्हा हेचि झाले पुरे ।
घरोघरी ओवाळणी । विठ्ठल देखिल नयनी ॥

अशातऱ्हेने आपल्या आध्यात्मिक अनुभवाला सामान्यांच्या परिभाषेत नेऊन सोडले. त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य असे की काव्यासाठी त्यांनी षडक्षर चरणात्मक निवृत्त गायत्री अभंग-छंद बऱ्याच प्रमाणात वापरलेला दिसून येतो. आपण वापरीत असलेल्या छंदावर त्यांचा एक स्वतंत्र अभंगही उपलब्ध आहे. प्रचाराची व प्रवासाची फारशी साधने उपलब्ध नसतानाही नामदेवांनी जे कार्य केले ते आश्चर्यकारक म्हणावे लागेल. ते कार्यही कसे तर नि:स्वार्थ वृत्तीने संत मंडळींनी सुखात रहावे, हरिदास चिरंजीव ठरावेत, ज्यांच्या मुखी पांडुरंग आहे ते सुखात रहावेत, सर्वांचे कल्याण व्हावे, एवढीच त्यांची देवापाशी मागणी होती.

सुखाच्या शोधात धावण्यात काहीच अर्थ नाही. सर्व माणसांत परमेश्वर असतो. माणसांवर प्रेम केल्यामुळेच परमेश्वरावर प्रेम केल्याचे समाधान लाभते. म्हणून परस्परांवर प्रेम करावे. भगवंतांचे अधिष्ठान असेल तरच समाज समृद्ध होतो. म्हणून त्यांची लोकांना संसार करून परमार्थ साधावा, त्यास नैवेदय, उपासनेची जरुरी नाही, तर केवळ परमेश्वराच नामस्मरण केले तरी पुरेसे आहे असा उपदेश केला. ते म्हणतात,

Third, while working hard for the fulfilment of our aims, we must consciously or unconsciously perform good deeds. In the course of our working towards our aims we have to come across people with whom we ought to behave properly and treat them well. These things go by the name of 'love' for all. Our goal or aim may be our fixed post towards which we march,but we cannot be blind to the society or the world in which we live. On the path of life, when we meet sorrows befalling us, or our friends, we must stop to share in their sorrows, as we would, in their joys. The real happiness of living a life with an aim and succeeding lies in how many people we met and how many of them helped us or felt for us. It is not necessary or posible for all of us to become famous in our lives. What is important is that each one of us should in his or har own humble way create something. This thing that we create, or bring into existence, a work done with our hands stands out as a symbol of our existence and will be remembered by those close to us. This kind of thing that is created calls for a sense of integrity.

to show off. But one should keep in one's mind that one should wear whatever suits one's personality and sex. Whatever we wear, however odd it may look is considered a new fashion. The girls who are simple in their dress and really attractive are not recognized. Some of these girls are changing for the worse wanting to catch public eye. I think that the inclination towards 'modelling' as a profession among some girls has become a fad in recent years. Modelling fetches income and it happens to be a passport to getting into films.

The modern girls and women with modern fashions and modern views are being liked by the modern men with similar views and outlook on life. But, we should not for to wear only those dresses which suit them. T is the basic things. One should not wear a dre which a particular person or particular persons appro This will mean the loss of freedom to dress as o likes. Fashions are not everything.

I have my own view, which is that fashional things or fashions are not in themmselves wro One should move with the time. But, our nation, o culture, has the sari and the salwar kameez as patent dress though times have changed. It is t most modest, attractive, ornamental dress whi proclaims our nation's character. Many foreign wom look more attractive in saris than in their gowns a skirts. Dress after all, is only the outer cover fo human being. We can imitate permanent things, th is, ideas, discipline, patriotism, which are the symbo of some foreign countries. As Nehru says there so much in each culture to take and so much t our culture to give up that if we take the best fro all cultures and become a citizen of the world, will be the best fashion, ever.

हार्दिक शुभेच्छा

स्थापना : १९८३
सभासद संख्या ३५४०

नोंदणी क्र
PNS/BMT/CONS/196

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय
विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार मर्यादित
बारामती ४१३ १०२ जि. पुणे
विद्यार्थ्यांसाठी खास सवलतीच्या दराने स्टेशनरी उपलब्ध केली जाईल.

प्रा. ए. बी. भगाटे
सचिव

प्रा. पी. बी. इंग
अध



## जिमखाना अहवाल

### "वरिष्ठ महाविद्यालय"

१) पुणे जिल्हा आंतर महाविद्यालयीन स्पर्धामधील महाविद्यालयाचे विजयी व उपविजयी संघ

| | संघ | विजयी / उपविजयी |
|---|---|---|
| १. | बास्केटबॉल (मुली) | विजयी |
| २. | खो-खो (मुली) | विजयी |
| ३. | हॅण्डबॉल (मुली) | उप-विजयी |
| ४. | ४ x १०० मिटर रिले (मुली) | विजयी |
| ५. | कुस्ती ५७ कि. वजन गट | प्रथम क्रमांक |
| ६. | वजन उचलणे ६० किलो गट | प्रथम क्रमांक |
| ७. | वजन उचलणे ६७.५ किलो गट | प्रथम क्रमांक |
| ८. | शरीरसौष्ठव ७५ कि. वजन गट | प्रथम क्रमांक |
| ९. | शरीर सौष्ठव ६५ कि. वजन गट | प्रथम क्रमांक |
| १०. | हातोडा फेक (मैदानी स्पर्धा) | प्रथम क्रमांक |
| ११. | मल्लखांब मुले | उप-विजयी |

२) पुणे जिल्हा क्रीडा विभागाकडून महाविद्यालयाचे निवड झालेले खेळाडू.

| | | |
|---|---|---|
| १. | हॅण्डबॉल (मुले) | ३ |
| २. | बास्केटबॉल (मुले) | २ |
| ३. | बॅडमिंटन (मुली) | १ |
| ४. | कबड्डी (मुली) | २ |
| ५. | कबड्डी (मुले) | १ |
| ६. | बास्केटबॉल (मुली) | ७ |
| ७. | कुस्ती | १ |
| ८. | मल्लखांब | २ |
| ९. | बॉल बॅडमिंटन | १ |
| १०. | मैदानी स्पर्धा (मुले) | १ |
| ११. | मैदानी स्पर्धा (मुली) | ४ |
| १२. | वजन उचलणे (मुले) | २ |
| १३. | शरीर सौष्ठव मुले | २ |
| १४. | खो-खो मुली | ५ |

३) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पुणे विद्यापीठाच्या संघामध्ये महाविद्यालयाचा खेळाडू **श्री. दीपक खरात** याची कबड्डीमध्ये निवड झाली.

४) **विशेष अभिनंदन :**

| | |
|---|---|
| **१. कु. मीना सोनगांवकर** | पुणे जिल्हा विभाग बास्केटबॉल (मुली) संघाची संघनायिका म्हणून निवड. |
| २. कु. शर्मिला कुलकर्णी | पुणे जिल्हा विभाग खो-खो (मुली) संघाची संघनायिका म्हणून निवड. |
| ३. कु. मंजूषा खोचरे | पुणे जिल्हा विभाग कबड्डी (मुली) संघाची संघनायिका म्हणून निवड. |

४) बारामती येथे पोलिस दिनानिमित्त स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या, या स्पर्धांत आमच्या महाविद्यालयाची कबड्डी मुले व मुली हे दोन्ही संघ अजिंक्य ठरलेले आहेत.

आंतरमहाविद्यालयीन आंतरविभागीय, व आंतरविद्यापीठीय स्पर्धेमध्ये निवड झालेल्या खेळाडूंची संख्या.

| अ.क्र. | खेळाचे नांव | मुले आंतर महाविद्यालयीन | आंतर विभागीय | आंतर विद्यापीठ | मुली आंतर महाविद्यालयीन | आंतर विभागीय | आंतर विद्यापीठ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | हॅण्डबॉल | १२ | ३ | -- | -- | -- | -- |
| २. | बॅडमिंटन | ४ | -- | -- | ४ | १ | -- |
| ३. | कबड्डी | १२ | १ | १ | १० | २ | -- |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | व्हॉलीबॉल | १२ | -- | -- | -- | -- | -- |
| ५. | बास्केटबॉल | १२ | २ | -- | १२ | ७ | -- |
| ६. | टेबलटेनिस | ४ | -- | -- | -- | -- | -- |
| ७. | बुद्धिबळ | ५ | १ | -- | -- | -- | -- |
| ८. | मल्लखांब | ५ | २ | -- | -- | -- | -- |
| ९. | खो-खो | १२ | -- | -- | १२ | ५ | -- |
| १०. | मैदानी स्पर्धा | ८ | १ | -- | ५ | ४ | -- |
| ११. | वजन उचलणे व शरीर सौष्ठव | ५ | ४ | -- | -- | -- | -- |
| १२. | बॉल बॅडमिंटन | ७ | १ | -- | -- | -- | -- |
| १३. | कुस्ती | ११ | १ | -- | -- | -- | -- |
| १४. | क्रॉसकन्ट्री | ६ | -- | -- | -- | -- | -- |

**प्रा. सुरेश इंगवले,** शारीरिक शिक्षण संचालक

✣ ✣ ✣ ✣

## जिमखाना अहवाल

### "कनिष्ठ महाविद्यालय"

**आयोजित क्रीडा स्पर्धा :-**

१) तालुका पातळीवरील मैदानी स्पर्धा मुले / मुली

२) गटपातळीवरील मैदानी स्पर्धा मुले / मुली

३) गटपातळीवरील व्हॉलीबॉल स्पर्धा मुले / मुली

**महाविद्यालयातील विविध खेळातील यश.**

१) कबड्डी मुले - विभागीय स्पर्धेमध्ये अहमदनगर येथे उपविजयी.

२) बास्केटबॉल मुले - पुणे येथे जिल्हा पातळीवर उप-विजयी.

३) मैदानी स्पर्धा मुली - सोलापुर येथील विभागीय पातळीवर रिले संघ उपविजयी.

**विविध खेळातील यशस्वी खेळाडू**

**कबड्डी :- (मुले)**

सिंधुदुर्ग (सावंतवाडी) येथे झालेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये १) श्री. संतोष झगडे २) श्री.गोपाळ वाल्मिकी या दोन खेळाडूंची निवड झाली.

**मैदानी स्पर्धा :- (मुली)**

सोलापुर येथे झालेल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये १) कु. अर्चना भापकर (लांबउडी) २) कु. तनुजा घाडगे ८०० मिटर धावणे या दोन खेळाडूंची निवड झाली.

**बास्केटबॉल :-**

सातारा येथे झालेल्या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेमध्ये श्री. नजीर शेख याची निवड झाली.

**कुस्ती :-**

१) **श्री. अनंता काळे -** अहमदनगर येथे झालेल्या विभागीय पातळीवर ६२ कि. वजन गटामध्ये द्वितीय क्रमांक.

२) **श्री. देवीदास ढोले :-** पुणे येथे झालेल्या जिल्हा पातळीवर ५८ कि. वजन गटामध्ये द्वितीय क्रमांक

३) **श्री. प्रशांत चव्हाण :-** पुणे येथे झालेल्या जिल्हा पातळीवर ६८ किलो वजन गटामध्ये द्वितीय क्रमांक.

**श्री. बबनराव गावडे,** शारीरिक शिक्षण संचालक



## राष्ट्रीय छात्र सेना अहवाल

छात्र संख्या - १०६

| १) विविध कार्यक्रम | ठिकाण | दिनांक |
|---|---|---|
| १. १५ ऑगष्ट १९९२ स्वातंत्र्यदिन मानवंदना | महाविद्यालय | १५.८.९२ |
| २. रक्तदान शिबीर | महाविद्यालय | १५.८.९२ |
| ३. वृक्षारोपण | महाविद्यालय | १८.८.९२ |
| ४. वार्षिक प्रशिक्षण शिबीर (फायरिंग) | मुंढवा - पुणे कॅम्प | २४.१०.९२ |
| ५. रक्तदान शिबीर | मुंढवा पुणे | ३०.१०.९२ |
| ६. २६ जानेवारी १९९३ प्रजासत्ताकदिन मानवंदना | महाविद्यालय | २६.१.९३ |
| ७. रक्तदान शिबीर | महाविद्यालय | २९.१.९३ |

**२) छात्रसैनिकांचा विशेष सहभाग :-**

१) २६ जानेवारी १९९३ रोजी बारामती येथील सरकारी ध्वजसंचलनामधील स्पर्धेमध्ये उत्कृष्ट संचलनाचे पहिले पारितोषिक.

३) सोलापूर येथे झालेल्या आर.डी.कॅम्प (दि. ५ जुलै ते १५ जुलै ९२) साठी पुढील छात्रांची निवड झाली होती.

**१. श्री. रवींद्र भिमराव टकले (कार्पोरल)**

**२. श्री. मेहबूब महंमद शेख (अंडर ऑफिसर)**

**३. श्री. बोरसे मनीष शिवाजीराव (कार्पोरल)**

**४. श्री. प्रमोद भिमराव काळे (कार्पोरल)**

४) १) **श्री. काळे प्रमोद भिमराव (कार्पोरल)** ॲडव्हान्स लीडरशिप कॅम्पमध्ये सहभाग. व्ही. व्यंकटायपालम (आंध्र प्रदेश) दि. २६.९.९२ ते ७.१०.९२ या कॅम्पमध्ये नेमबाजी, नकाशावाचन, नेव्हल आणि आधुनिक शस्त्रास्त्रासंबंधीचे प्रशिक्षण घेतले.

५) अहमदनगर येथे एम.आय.आर.सी.रेजिमेंटमध्ये आर्मी अटॅचमेंट कॅम्प पुढील कॅडेटस्नी पूर्ण केला. या कॅम्पमध्ये आधुनिक क्षेपणास्त्रे, रणगाडे, बी.एम.पी.यांच्या कवायती, नेमबाजी, एस.एस.आर. इत्यादीचे प्रशिक्षण घेतले. (दि. १९.९.९२ ते ३.१०.९२)

**१) कार्पोरल पोमणे राजेंद्र दादासाहेब**

**२) कार्पोरल बोराटे महादेव नामदेव**

६) वार्षिक प्रशिक्षण शिबीर मुंढवा-पुणे ड्रिल कॉम्पिटिशन अंडर ऑफिसर दि. २४.१०.९२ ते २.११.९२

**१) अंडर ऑफिसर मेहबूब महंमद शेख**

**२) अंडर ऑफिसर शरद किसन वेदपाठक**

७) **श्री. रवींद्र भिमराव टकले (कार्पोरल)** यांची मल्लखांब या इव्हेन्टमधून दिल्ली परेडसाठी निवड व प्रत्यक्ष सहभाग. २६ जानेवारी १९९३. या निवडीसाठी त्यांना पुढील कॅम्प करावे लागले.

१) सोलापूर -आर.डी.कॅम्प निवड (५ जुलै ते १५ जुलै १९९२)

२) प्री. आर.डी.कॅम्प अहमदनगर (७ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर १९९२)

३) मुंढवा-पुणे प्री आर.डी.कॅम्प (५ नोव्हें. ते १५ नोव्हें. १९९२)

४) आर.डी.कॅम्प घोरपडी-पुणे (१३ जानेवारी ते २ जानेवारी १९९३)

५) आर.डी.कॅम्प दिल्ली (३ जानेवारी ते ३० जानेवारी १९९३)

६) पोस्ट आर.डी.कॅम्प, मुंबई (१ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी १९९३)

८) सर्टिफिकेट निकाल

१) "बी" सर्टिफिकेट परीक्षेत ३० छात्रांपैकी २८ उत्तीर्ण.

२) "सी" सर्टिफिकेट परीक्षेला ८ छात्रांपैकी ३ उत्तीर्ण.

**कॅप्टन मानसिंगराव गोडसे, प्रमुख**

# राष्ट्रीय सेवा योजना

**उद्घाटन :-** दिनांक ९ ऑगष्ट, १९९२ रोजी ''ऑगष्ट क्रांती'' दिनाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या प्रथमदिनी हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी स्वीकारून या कार्यक्रमात योगदान देण्याची ग्वाही दिली. एकूण २०० विद्यार्थी या योजनेत सहभागी करून घेणेत आले.

**रक्षाबंधन :-** दिनांक १३ ऑगष्ट, १९९२ रोजी ''रक्षाबंधन'' निमित्त रिमांड होम, बारामती येथील १२५ विद्यार्थ्यांना राखी बांधून मिठाई वाटण्यात आली.

**सद्भावना दिन :-** दिनांक २० ऑगष्ट, १९९२ रोजी माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांचा जन्मदिन सद्भावना दिन म्हणून साजरा करण्यात आला. त्यावेळी सर्व स्वयंसेवकांना मा. उपप्राचार्य डॉ.के.एम.सुर्वे यांनी ''राष्ट्रीय एकात्मता शपथ'' दिली.

**आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन :-** दिनांक ८ सप्टेंबर, १९९२ रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त बारामती शहरातून विविध घोषणाफलक घेऊन साक्षरता दिंडी काढण्यात आली. त्यावेळी प्रत्यक्ष निरक्षरांना भेटून त्यांना साक्षरतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

**सार्वजनिक गणेशोत्सव :-** राष्ट्रीय सेवायोजनेतील ५० स्वयंसेवकांनी गणेशोत्सव काळात शांतता राखण्यासाठी पोलीस दलास मदत केली.

**एक दिवसीय शिबिरे :-** मौजे उंडवडी (क.प.) व सावळ या दत्तक खेड्यात एक दिवसीय शिबिर घेऊन ग्रामसफाई व प्रौढांना साक्षरतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

**विशेष हिवाळी शिबीर :-** दिनांक ६ डिसेंबर ते १५ डिसेंबर, १९९२ या काळात मौजे उंडवडी (क.प.) येथे १०० विद्यार्थ्यांचे विशेष हिवाळी शिबिर घेण्यात आले. या काळात विद्यार्थ्यांनी श्रमदानातून भैरवनाथ शिक्षण मंडळाच्या मालकीच्या जमिनीवर २५० फूट लांब, ३० फूट रुंद व १० फूट उंचीचा बंधारा बांधून दिला. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येकी २ या प्रमाणे शिबीर काळात प्रौढांना साक्षर करण्याचे काम केले.

**परिसर स्वच्छता, श्रमदान :-** महाविद्यालय परिसरात नियमित कार्यक्रमांतर्गत परिसर स्वच्छता तसेच श्रमदानातून नवीन बाग तयार करण्यास मदत करण्यात आली. कॉलेज क्रीडांगण तसेच नारळ व साग या बागांची स्वच्छता ठेवण्यात आली.

**गटप्रमुख :-**

१) श्री. जे.के.सातपुते,
२) श्री.एस.आर.बगाडे,
३) श्री.ए.एस.नवले,
४) कु.एस.ए.धायगुडे,
५) कु.बी.एन.ढवळे,
६) कु.ए.जी.यादव,

**विद्यार्थ्यांचा विविध शिबिरातील सहभाग :-**

| दिनांक | उपक्रमाचे नांव व ठिकाण | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| २१,२२ व २३ सप्टेंबर,१९९२ | व्योमिनी शिबीर मुंबई, व्योमिनी | १) श्री.जे.के.सातपुते |
| व २५,२६,२७ व २८ डिसेंबर, १९९२ | विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी | |
| ११.८.९२ | स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार आणि ''चलेजाव आंदोलन :नवे संदर्भ'' चर्चासत्र,पुणे विद्यापीठ,पुणे | १) श्री. शशिकांत सकट, २) कु. व्ही.एन.निर्मल |



| १ | २ | ३ |
|---|---|---|
| २०.१२.९२ ते २९.१२.९२ | राष्ट्रीय एकात्मता शिबीर, तिरुन्नली, केरळ | १) श्री.अरुण कुंभार |
| ८ ते १२ जानेवारी,१९९३ | विद्यापीठस्तरीय मुलींचे विशेष शिबीर, कळवण | १) कु. अे. जी. यादव, २) कु. पी.व्ही. खंडाळे, |
| ८ ते १२ जानेवारी, ९३ | विद्यापीठस्तरीय मुलांचे विशेष शिबीर, जुन्नर | १) श्री.एस.आर.बगाडे |
| १० जानेवारी, ९३ | ''पाणलोट क्षेत्र विकास'' कार्यशाळा, भोर | १) श्री. ए.एस.नवले, २) श्री.ए.एस.लोणकर |
| २०,२१,व २२ जानेवारी, १९९३ | ''युवक नेतृत्व प्रशिक्षण शिबीर'' इंदापूर, | १) श्री. एम.एन. वाबळे, २) श्री.डी.सी.वाबळे, ३) श्री. ए.एस.नवले, ४) श्री.एस.व्ही.कुंभार, ५) श्री. एम.व्ही.शिर्के, ६) श्री.ए.एस.लोणकर, ७) श्री.के.एस.शेलार, ८) श्री.डी.एम.येडे, ९) श्री.आर.के.खरात, १०) श्री.बी.व्ही.खरात, |



**प्रा. केशवराव ढमाळ,**
**प्रा. तुकाराम खोत,**
कार्यक्रम अधिकारी

✧ ✧ ✧ ✧

# ग्रंथालय अहवाल

''ग्रंथालये ही ज्ञानाची सदावर्ते आहेत.'' तेव्हा अधिक उत्तम व दुर्मिळ ग्रंथांची सातत्याने भर घालण्यात महाविद्यालय प्रयत्नशील आहे.

**ग्रंथ संपदा : (कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय)**

**ग्रंथ :-**

क्रमिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ (३१/३/९३ अखेर) एकूण ग्रंथ ७७,५५६, ग्रंथाची किंमत रु. १९,२८,६१६/-

**नियतकालिके :-**

सन १९९२-९३ वर्षात १६३ नियतकालिके खरेदी करण्यास रुपये १३,०६९ खर्च केले व कांही भेट स्वरूपात आली.

**वृत्तपत्रे :-**

एकूण १२ वर्तमानपत्रे (विविध भाषेतील) त्याकरिता रुपये ७५००/- खर्च केले जातात.

**स्पर्धा व सामान्यज्ञान परीक्षा ग्रंथ-साहित्य :-**

ग्रंथालयात महाराष्ट्र लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, चार्टर्ड अकौंटंट, आय.सी.डब्ल्यू.ए. भारतीय उद्योगतंत्र

विज्ञान, मेडिकल, इंजिनियरिंग व सामान्यज्ञान स्पर्धा इ. परीक्षांकरिता आवश्यक अद्यावत ग्रंथसाहित्य व माहितीपत्रके उपलब्ध.

**व्यवसाय व व्यवस्थापन ग्रंथ साहित्य :-**

ग्रंथालयात डी.बी.एम., डी.टी.एल., एम.पी.एम. व्यवस्थापन अभ्यासाकामाचे ग्रंथसाहित्य उपलब्ध केले आहे. शिवाय व्यवसाय मार्गदर्शन, स्वयंरोजगार, आरोग्य व आहार, पाकशास्त्र, योगाभ्यास इ. करिता ग्रंथसंपदा उपलब्ध

**अभ्यासिका :-**

विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे दोन प्रशस्त अभ्यासिकांची सोय उपलब्ध केली आहे.

**आर्थिक सहाय्य व ग्रंथदान भेट :-**

लायन्स क्लब, बारामती कडून ''पुस्तक पेढी'' करीता रुपये १००० आर्थिक सहाय्य मिळाले.

प्राचार्य डॉ.जे.के.गोधा, प्राचार्य एस.पी.कदम, प्रा.जी.व्ही.गायकवाड, श्री.विलास मोहिते, श्री. गुजर (प्रदीपकुमार सायकल मार्ट, बारामती) शेठ पब्लिकेशन्स प्रा.लि.मुंबई, निराली प्रकाशन, पुणे, नेंद्र प्रकाशान, पुणे, बाहुवली प्रकाशन, कुंदकुंद भारती, नवी दिल्ली, या व्यक्तींनी व संस्थांनी भेटी दाखल मौलिक ग्रंथ दान करून उपकृत केले आहे.

**ग्रंथपेढी :-** (Book-Bank)

सन १९९२-९३ या वर्षात ग्रंथ पेढीतून पुढीलप्रमाणे विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच अभ्यासाकरिता देण्यात आले.

वरिष्ठ महाविद्यालय - २१२ विद्यार्थ्यांना पुस्तकसंच

कनिष्ठ महाविद्यालय - ३०३ विद्यार्थ्यांना पुस्तकसंच

**ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे सुयश :**

पुणे विद्यापीठाचा जून १९९१ पासून ग्रंथालय व माहिती पदवी अभ्यासाक्रम सुरू करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची उत्तम सोय केली आहे. या वर्गाचा मार्च १९९२ परीक्षेचा निकाल ८८% लागला आहे.

**प्रा. सुरेश पाटील**
ग्रंथपाल,

◇ ◇ ◇ ◇

## ''कविवर्य मोरोपंत वाद-वक्तृत्व स्पर्धा''

### वार्षिक अहवाल - १९९२ - ९३.

कविवर्य मारोपंत आंतरमहाविद्यालयीन वाद व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन दि. ९ ऑक्टोबर व १० ऑक्टोबर १९९२ रोजी करण्यात आले.

अ) वाद स्पर्धेचा विषय :-

''भारतीय राजकारणातील नीतिमत्ता रसातळाला गेली आहे.'' वाद स्पर्धेत १९ महाविद्यालयाच्या ३४ विद्यार्थी-विद्यार्थिनी स्पर्धकांनी सहभाग घेतला.

ब) वक्तृत्व स्पर्धेचे विषय :-

१) ''मोरोपंतांची संतवर्णनपर प्रकरणे' २) ''मोरोपंतकृत श्रीकृष्ण विजय'' ३) ''येरे येरे पावसा, तुला देतो काळा पैसा'' ४) ''राममंदिराचे राजकारण कशासाठी ?'' ५) ''चले जाव आंदोलन : नवे संदर्भ.'' ६) 'अहो, मला जगायचयं !'' ७) 'आजचे शिक्षण : समस्या की साधन ?'

वक्तृत्व स्पर्धेत ३३ विद्यार्थी-विद्यार्थिनी स्पर्धकांनी सहभाग घेतला.

क) उत्सूफूर्त वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन :-

या स्पर्धेत २२ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

**उद्घाटन :-** वाद व वक्तृत्व स्फर्धांचे उद्घाटन **मा.सौ. विजयाताई सस्ते,** उपाध्यक्षा, माळेगांव सहकारी साखर कारखाना, शिवनगर, जि. पुणे यांच्या शुभहस्ते व **मा. सदाशिवराव सातव,** नगराध्यक्ष, बारामती नगरपरिषद, यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

**पारितोपिक वितरण :-** वाद व वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख पाहुणे **मा. श्री. विद्याधरजी गोखले,** अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन व **मा. श्री. प्रभाकर देशमुख,** प्रांताधिकारी, बारामती विभाग, यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. विजेत्या स्पर्धकांना मा. विद्याधर गोखले व मा. प्रभाकर देशमुख यांच्या शुभहस्ते पारितोषिके प्रदान केली.

पारितोषिके विजेते :-

**वक्तृत्व स्पर्धा :-** कु. उर्मिला जोशी, एस.पी.कॉलेज, पुणे या विद्यार्थिनी स्पर्धकाला वक्तृत्वात प्रथम क्रमांक मिळाला व वैयक्तिक चांदीची फिरती ढाल मिळाली.

**वाद स्पर्धा :-** कु. अरुंधती काणे व कु. गौरी वैद्य, एस.पी.कॉलेज, पुणे या स्पर्धकांनी वाद स्पर्धेत फिरती सांघिक चांदीची ढाल जिंकली. श्री. **अजिंक्य कुलकर्णी,** एम.आय.टी.पुणे या स्पर्धकाला गुणानुक्रमे सर्व प्रथम क्रमांकाचे रोख पारितोषिक मिळाले.

**उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा :-**

या स्पर्धेत अनुक्रमे श्री. अजिंक्य कुलकर्णी, एम.आय.टी., पुणे, कु. अरुंधती काणे, एस.पी.कॉलेज, पुणे, श्री. शिरीष केळकर, आय.एल.एस. लॉ कॉलेज, पुणे, श्री. चंद्रकांत निकम, लासलगांव कॉलेज, लासलगांव यांनी बक्षिसे मिळविली.

आमच्या महाविद्यालयातील स्पर्धकांचा इतर ठिकाणी आयोजित स्पर्धामध्ये सहभाग व संपादन केलेली पारितोषिके.

१) **कु. वर्षा पळसुले व कु. मनीषा सुभाष मिसाळ** या विद्यार्थिनींनी श्री. अनंतराव थोपटे महाविद्यालय भोर, जि. पुणे. द्वारा आयोजित वाद स्पर्धेत अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकांची रोख पारितोषिके व स्पर्धेची फिरती ढाल पटकावली.

२) **श्री. दत्तात्रय तुकाराम जाधव व श्री. अनिलकुमार दत्तात्रय रुपनवर** या विद्यार्थ्यांनी यूथ होस्टेल असोसिएशन ऑफ इंडिया, अलिबाग युनिट यांचे वतीने आयोजित वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके संपादन केली.

३) **कु. मनीषा सुभाष मिसाळ व श्री. दत्तात्रय तुकाराम जाधव** या स्पर्धकांनी पुणे येथील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या व संपूर्ण महाराष्ट्रात गाजलेल्या रानडे वाद स्पर्धामध्ये आपला सहभाग नोंदवून प्रशस्तिपत्रके मिळविली.

४) **श्री. विष्णू शामराव मस्के** या स्पर्धकाने पुणे येतील वामन मल्हार आंतर महाविद्यालयीन वाङमयीन वक्तृत्व स्पर्धेत आपला सहभाग नोंदवून प्रशस्तिपत्रक मिळविले.

**प्रा. डॉ. सदाशिवराव खरोसेकर**
कार्याध्यक्ष,

◇ ◇ ◇ ◇

## प्रौढ शिक्षण कार्यक्रम

पुणे जिल्ह्यातील निरक्षरतेचे संपूर्ण निर्मूलन करण्यासाठी जिल्हा साक्षरता मंचचे कार्य सुरू असून महाविद्यालयाचा सहभाग लक्षणीय आहे. हा कार्यक्रम शासकीय नसून ते जन आंदोलन आहे व सर्वांचा सक्रिय सहभाग असल्याशिवाय तो यशस्वी होत नाही याची जाणीव महाविद्यालयास आहे. त्या दृष्टीने महाविद्यालयाने या वर्षी इंडियन इंस्टिट्युट, पुणे विद्यापीठ, तालुका साक्षरता मंच शासकीय अधिकारी, नगर सेवक इत्यादींशी सतत संपर्क ठेवून बारामती शहरातील निवडलेल्या ८ वॉर्डसुमध्ये प्रौढ शिक्षण वर्ग चालविले. गतवर्षीपेक्षा या वर्षी समन्वय जास्त असल्याने प्रगती झाली. तरी अजूनही १०० टक्के साक्षरता आलेली नाही हे लक्षात घ्यावे लागेल.

महाविद्यालयाने प्रत्येक वॉर्डसाठी विद्यार्थी स्वयंसेवक, प्राध्यापक, समन्वयक अशा समित्या स्थापून वेळोवेळी प्रगतीचा आढावा घेतला. सर्वांनी दररोज वॉर्डास भेटी दिल्या. ११ वी व एन.एस.एस.च्या विद्यार्थ्यांनी साक्षरतेचे वर्ग चालविले. काही ठिकाणी ''इच वन टीच वन'' किंवा 'टू'' किंवा ''थ्री'' या पद्धतीचाही अवलंब केला गेला. याचा परिणाम काही वॉर्ड (उदा. आमराई, दत्तगुरु) पूर्ण साक्षर होण्याच्या मार्गावर आहेत.

या कामी मा. प्राचार्य एस.पी.कदम यांनी वर्गांच्या पहाणीसाठी व मार्गादर्शनासाठी दररोज भेटी दिल्या. त्याचाच परिणाम होऊन कार्यक्रम बराच यशस्वी झाला.

प्रौढ निरक्षरांना शिकविण्यासाठी नेमलेल्या विद्यार्थी स्वयंसेवकांचे प्रशिक्षण २९ व ३० जुलै १९९२ रोजी महाविद्यालयांत घेण्यात आले व मध्यावधी प्रशिक्षण १७ व १८ नोव्हेंबर १९९२ रोजी नगर परिषद शाळा नं. ५

मध्ये पार पडले.

८ सप्टेंबर १९९२ रोजी शहरातून साक्षरता दिंडी काढण्यांत आली. तालुका साक्षरता मंचतर्फे ८ सप्टेंबर ९२ व २ ऑक्टोबर ९२ या दिवशी महाविद्यालयांतील ३० प्राध्यापकांनी तालुक्यातील ३० ठिकाणी जाऊन प्रौढ निरक्षरांना व्याख्याने दिली व प्रौढांचे मूल्यमापन केले. १३ ऑक्टोबर १९९२ रोजी तालुका मंचतर्फे ॲग्रिकल्चरल ट्रस्ट (माळेगांव कॉलनी - शारदानगर) येथे मेळावा भरला होता. त्या निमित्त महाविद्यालयांस मा.उप-कुलगुरु डॉ. मोहनराव हापसे, डॉ. उत्तमराव भोईटे (विद्यापीठ प्रौढ शिक्षण विभाग प्रमुख) व श्री. तेज निवळीकर यांनी भेटी दिल्या.

दिनांक २.१०.१९९२ , ८.१२.१९९२ व २६.१.१९९३ रोजी प्रौढांचे मेळावे घेऊन मूल्यमापन चाचण्या घेण्यात आल्या, पैकी २६.१.१९९३ चे मूल्यमापन हे शासकीय मूल्यमापन होते. त्यामध्ये महाविद्यालयाकडील ८ वॉर्डसमधून एकूण ५३५ निरक्षरांपैकी २५० निरक्षरांनी भाग घेतला.

१५ जानेवारी - १९९३ रोजी महाविद्यालयात नगर परिषदेतर्फे प्राध्यापक व विद्यार्थी स्वयंसेवकांचा मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यास मा. श्री देरकर, मुख्याधिकारी, बारामतीनगर परिषद यांनी मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यांसाठी शहरातील काही व्यक्तींनी आम्हास अशय मदत केली त्यांचा उल्लेख आवश्यक आहे. त्या व्यक्ती खालीलप्रमाणे :-

मा. श्री. देशमुख प्रांतसो।, मा. श्री देरकर, मुख्याधिकारी, बारामती नगर परिषद, मा. श्री. निंबाळकर, शिक्षण विभाग, बारामती नगर परिषद, मा. श्री. आर.के.वाघ गट विकास अधिकारी, मा. श्री.बी.एस.पऱ्हाड तहसिलदार, श्री. पी.डी.काळे (गुरुजी) बीट समन्वयक, बारामती नगर परिषद, श्री.पी.बी.नरुटे, मौलाना अब्दुलगणी साहब (जामा मशीद) अब्दुल गणी शेख, बाबू मियाँ शेख, सौ. सुफिया शेख, सौ. शाहजन शेख, सौ. रजिया शेख, श्री. राहुल ढोले, सर्व जुनी मंडई / शंकर भोई वॉर्ड, श्रीमती कांबळेबाई, श्री. ज्ञानेश्वर दुर्गे, श्री. सोनवणे (किराणा दुकानदार), सर्व श्याम टॉकीज वॉर्ड, तसेच बादशाबाई शेख, लक्ष्मण धोत्रे, रामदास तोरडमल, विजय बनकर, सर्व आमराई वॉर्ड यांनी विशेष परिश्रम घेतले. त्याचप्रमाणे श्री. सुनील बगाडे (आमराई वॉर्ड) एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनी सक्रिय मदत केली त उल्लेख आवश्यक आहे. तसेच कमिटीतील प्राध्यापक, वी चे विद्यार्थी-स्वयंसेवक यांनी वर्ग चालविले त्यांच्या हा कार्यक्रम सुरू होऊ शकला नसता, त्यांचाही आवश्यक आहे.

दि. ५.२.९३ रोजी राष्ट्रीय साक्षरता मिशन यांनी कॉलेज केंद्रांना भेटी देऊन समाधान व्यक्त केले.

दिनांक १७.९.१९९२ राजी विद्यापीठांत क्षेत्रीय कार्यक्रमांसंदर्भात मीटिंग होऊन महाविद्यालयाने मौजे हा परिसर निवडला असून तसा प्रस्ताव सदर मीटिं वेळी विद्यापीठास सादर केला आहे.

**प्रा. अरुण पं**

प्र

◇ ◇ ◇ ◇

## पुणे व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ इतिहास अध्यापक परिपदेचे ५ वे अधिवेशन

पुणे विद्यापीठ व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कक्षेत इतिहास प्राध्यापक परिषदेचे ५ वे अधिवेशन आम महाविद्यायात दिनांक १ ते ३ जानेवारी १९९३ संपन्न झाले. पुणे, उत्तर महाराष्ट्र व शिवाजी विद्या कक्षेतील इतिहास प्राध्यापक बहुसंख्येने अधिवेशन सहभागी होते.

**उद्घाटन समारंभ :-**

शुक्रवार दिनांक १ जानेवारी १९९३ रोजी प्रा. डॉ. अ.रा.कुलकर्णी, ख्यातनाम इतिहास त व अध्यक्ष इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिस नवी दिल्ली यांच्या शुभहस्ते अधिवेशनाचे उद्घा झाले. त्यांनी ''मराठ्यांचा इतिहासः दशा व दिशा या विषयावर अभ्यासपूर्ण व उद्बोधक व्याख्यान दिले.

शनिवार दिनांक २ जानेवारी, १९९३ रोजी पहिल्या सत्रात मा. प्राचार्य सदाशिवराव आठवले तज्ज्ञ, इतिहास अभ्यासक, पुणे यांचे ''रामशास्त्री प्रभुणे'' या विषयावर चिकित्सक व्याख्यान झाले. दुसऱ्या सत्रात मा. प्रा.डॉ.म.दा.नलावडे, कुलसचिव, पुणे विद्यापीठ यांचे ''आधुनिक भारतातील बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन'' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले.

रविवार दिनांक ३ जानेवारी, १९९३ रोजी मा. प्रा. डॉ. एन.जी.भवरे, इतिहास विभाग प्रमुख, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे 'दलित चळवळ'' या विषयावर चिकित्सक व्याख्यान झाले.

**सत्कार व समारोप :-**

इतिहास अध्यापक परिषदेचे अध्यक्ष व इतिहास विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ मा. डॉ.कृ.ना.चिटणीस हे अध्यापनाच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा निरोप व सत्कार मा. प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे, कार्यकारिणी परिषद सदस्य, पुणे विद्यापीठ यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याचवेळी मा.डॉ. उत्तमराव भोईटे, मा. डॉ. म.दा.नलवडे, सौ.राधा चिटणीस, मा. प्रा. सौ. डॉ. अनुराधा भोईटे, व डॉ. जे.के.गोधा यांचेही यथोचित सत्कार करण्यात आले.

**समारोप :-**

इतिहास अध्यापक परिषदेच्या ५ व्या अधिवेशनाचा सामारोप मा. डॉ. एन.जी.भवरे यांच्या हस्ते करण्यात आला. सदरच्या अधिवेशनात २५ प्राध्यापकांनी आपले शोधनिबंध सादर केले व त्यावर मौलिक चर्चा झाली.

**सांस्कृतिक कार्यक्रम :-**

अधिवेशनाच्या निमित्ताने आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी कलाकारांनी उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून अधिवेशनातील प्रतिनिधीचे मनसोक्त मनोरंजन केल्याने त्यांनी धन्यवाद दिले व कौतुक केले.

**आर्थिक सहाय्य व सहकार्य :-**

अधिवेशनाच्या निमित्ताने पुणे विद्यापीठ, पुणे, माळेगांव सहकारी साखर कारखाना, शिवनगर, माळेगांव, नगरपरिषद बारामती, बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, बारामती. दि. रुपी को ऑप. बँक, शाखा बारामती इत्यादी संस्थांनी भरघोस आर्थिक सहाय्य उपलब्ध करून उपकृत केले व मोलाचे सहकार्य केले.

महाविद्यालयाचे संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर सेवकांनी सदर अधिवेशन उत्कृष्टपणे आयोजन करण्यात बहुमोल सहकार्य केले. त्यामुळेच अधिवेशन यशस्वी झाले. त्याबद्दल सर्वांचा आभारी आहे.

**प्रा. आण्णासाहेब किणिंगे**

संयोजक,

◇ ◇ ◇ ◇

## शाळा महाविद्यालय समूह योजना आयोजित कार्यक्रम

व्याख्याने -

१) नागेश्वर विद्यालय, शेटफल गढे इ. ९ वी व इ. १० वी इंग्रजी विषयावर प्रा.कु.मीरा वैद्य यांनी व्याख्याने दिली.

२) नागेश्वर विद्यालय, शेटफळ गढे इ. ८ व इ. ९ वी. इंग्रजी वर्गावर प्रा. कु. आर. के. सुर्वे यांनी व्याख्याने दिली.

३) मिशन हायस्कूल, बारामती इ. १० वी मधील विद्यार्थ्यांना प्रा. बी.डी. सरवदे यांनी व्याख्याने देऊन इंग्रजी विषयावर मार्गदर्शन केले.

४) नवमहाराष्ट्र विद्यालय, पणदरे इ. १० वी विद्यार्थ्यांसाठी ''व्यवसाय मार्गदर्शन'' आणि उपयुक्त अभ्यासक्रम'' या विषयावर प्रा. बी.बी. पाटील यांनी व्याख्यान दिले.

५) शारदाबाई पवार विद्यालय, शिवनगर इ. १० वी विद्यार्थ्यांसाठी इतिहास विषयावर प्रा. पी. बी. इंगवले यांनी मार्गदर्शनपर व्याख्यान दिले.

६) वसतिगृह विद्यालय, कऱ्हाटी येथील इ. १० वी विद्यार्थ्यांसाठी ''व्यवसाय मार्गदर्शन आणि उपयुक्त अभ्यासक्रम'' या संबंधी प्रा. बी.बी.पाटील यांनी मार्गदर्शन केले.

७) श्री. बी. एस. शितोळे (शिक्षक) सुपे यांनी

मिशन हायस्कूलच्या इ. १० वी मधील विद्यार्थ्यांना गणित विषयासंबंधी मार्गदर्शन केले.

८) प्रा. के. एम. जाधव यांनी शाहू हायस्कूल, बारामती आणि नवमहाराष्ट्र विद्यालय, पणदरे या हायस्कूलमधील विद्यार्थ्यांच्या अभ्यासविषयक पध्दतीचे मानसशास्त्रीय विश्लेषण करून मार्गदर्शनपर उपयुक्त व्याख्याने दिली.

**प्रात्यक्षिके :-**

आर.एन.अग्रवाल टेक्निकल हायस्कूल मधील विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर प्रयोगशाळेमध्ये कॉम्प्युटरची ओळख माहिती आणि प्रत्यक्ष कार्यपध्दती या संदर्भात प्रा. एन. जे. सुबंध यांनी मार्गदर्शन केले.

**प्रा. मारुती भगत**
प्रमुख,

❖ ❖ ❖ ❖

## महाविद्यालय परिसर विकास व वनस्पतीशास्त्रीय उद्यान समिती

१. महाविद्यालयाच्या परिसरात श्री. गुरुवर्य समन्तभद्र योगधाम समोर एक एकर क्षेत्रात शोभिवंत नव उद्यानाची निर्मिती.

२. महाविद्यालयाचा परिसर सुशोभित व विकसित करण्यासाठी विविध प्रकारच्या सुयोग्य, शोभेच्या वनस्पतींची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात आली आहे.

३. वनस्पतिशास्त्र विषयाच्या अभ्यासाकरिता लागणाऱ्या वनस्पतींचे संगोपन, संवर्धन केले जाते. त्याचप्रमाणे एम.एस्सी. वनस्पतिशास्त्र या वर्गात अभ्यासासाठी लागणाऱ्या विविध औषधी वनस्पतींची लागवड करून अद्यावत असे वनस्पतीशास्त्रीय उद्यान (बोटॅनिकल गार्डन) निर्मितीत प्रयत्नशील आहे.

४. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागामार्फत वनराई प्रकल्प कार्यान्वित केला जात आहे. त्यामध्ये प्रामुख्याने निलगिरी व साग या वनस्पतींचे संगोपन संवर्धन केले जात आहे.

५. उद्यान विद्या विषयांतर्गत विविध फळझाडांची, भाजीपाला व शोभेच्या वनस्पतींची लागवड व प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम अमलात आणला जात आहे.

**प्रा. डॉ. सुभाष देवकुळे**
प्रमुख

❖ ❖ ❖ ❖

## सांस्कृतिक विभाग

सन १९९२-९३ शैक्षणिक वर्षात सांस्कृतिक विभागातर्फे

व्याख्याने

लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त प्रा. आण्णासाहेब किर्णि यांचे व्याख्यान

ऑगस्ट क्रांतिदिन सुवर्णमहोत्सव निमित्त मा. जीवाभाई कोठारी यांचे व्याख्यान

कर्मवीर भाऊराव पाटील जयंती निमित्त मा. डॉ. उत्तमराव भोईटे, अधिष्ठाता, मानस, नीती व सामाजिक शास्त्र, पुणे विद्यापीठ यांचे व्याख्यान.

शिक्षक दिना निमित्त श्री. प्र. द. पुराणिक (पुणे) यांचे व्याख्यान

स्वामी विवेकानंद जयंती निमित्त प्रा. डॉ. अनिरुद्ध देशपांडे, पुणे यांचे व्याख्यान.

महाराष्ट्र नाट्य परिषदेचे अध्यक्ष श्री. मच्छिंद्र कांबळी (मुंबई) यांचे व्याख्यान

विद्यार्थी सहभाग -

अभंग गायन स्पर्धा : अहमदनगर येथे तीन विद्यार्थ्यांनी अभंग गायन स्पर्धेत सहभाग घेतला श्री. केतन अ यांना उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.

नाट्य प्रशिक्षण : नटराज नाट्यकला मंडळ बारामती आयोजित नाट्य प्रशिक्षणात १५ विद्यार्थ्यांचा सहभाग.

सांस्कृतिक कार्यक्रम : पुणे विद्यापीठ इतिहास अध्यापक परिषदेत सांस्कृतिक कार्यक्रम सादर.

भक्तिगीत कार्यक्रम : बारामती नगरपरिषद आयोजित देशभक्तीपर गीतांच्या कार्यक्रमात सहभाग

विविध कला गुणदर्शन स्पर्धांचे आयोजन

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता वैयक्तिक समुहगीत गायन, वाद्यवादन, एकपात्री प्रयोग, लघुनाट्य व प्रसंगनाट्य, नाट्य काव्यवाचन, कथाकथन स्पर्धा आयोजित करून विजेत्या कलाकारांना वार्षिक गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभात पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.

**प्रा. प्रकाश पाटील**
प्रमुख

❖ ❖ ❖ ❖

## प.पू.गुरुदेव श्री समंतभद्र महाराज जन्मशताब्दी निमित्त शैक्षणिक परिषद संपन्न

प.पू.गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांच्या मंगल आशीर्वादाने व प्रेरणेने स्थापित 'अनेकांत एज्युकेशन सोसायटी' च्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालमध्ये प. पू. गुरुदेवांची जन्मशताब्दीपूर्ती समारंभ विविध औचित्यपूर्ण कार्यक्रमांनी संपन्न झाला.

शनिवार दि. १३ फेब्रुवारी १९९३ रोजी महाविद्यालयाच्या आवारात नवनिर्मित 'गुरुदेव श्री समन्तभद्र योगधाम' या वास्तूचे उद्घाटन नामवंत विद्वान व शिक्षणतज्ज्ञ यांच्या उपस्थितीत झाले. तसेच प. पू. गुरुदेवांच्या भव्य तैलचित्राचे अनावरण आणि 'विद्यमान शिक्षण पद्धतीचे एकविसाव्या शतकातील स्वरूप आणि अपेक्षा' या विषयावरील शैक्षणिक परिसंवाद असे कार्यक्रम पार पडले.

या शैक्षणिक परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत मा. नानासाहेब गोरे, थोर समाजशास्त्रज्ञ व जैन विद्याव्यासंगी डॉ. विलास संगवे (कोल्हापूर), नामवंत शिक्षणतज्ज्ञ डॉ. लीला पाटील (गारगोटी), प्रा. सौ. अनुराधा गुरव (कोल्हापूर), डॉ. गिरीश बापट (ज्ञानप्रबोधिनी, पुणे), डॉ. एस्. बी. गोगटे भारतीय शिक्षणशास्त्र संस्था, (पुणे), डॉ. म. दा. नलावडे (कुलसचिव, पुणे विद्यापीठ,) डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे (जयसिंगपूर), प्राचार्य डॉ. जे. के. गोधा, डॉ. श्रीधर हेरवाडे (कोल्हापूर) हे मान्यवर उपस्थित होते.

'गुरुदेव श्री समंतभद्र योगधाम' या वास्तूचे उद्घाटन डॉ. विलास संगवे यांनी करून समारंभाची सुरुवात केली. त्यानंतर ग्रंथालयाच्या सुशोभित सभागृहात श्री. जंबुकुमार शहा (सराफ) यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य समारंभ सुरू झाला.

प्रारंभी प्राचार्य एस. पी.कदम यांनी संस्थेच्या विकास कार्याची थोडक्यात ओळख उपस्थितांना करून दिली व सर्व निमंत्रितांचे स्वागत केले. त्यानंतर कोल्हापूर भागातील नामवंत कलाकार नांदणीचे श्री. दादा भगाटे यांच्या कुशल कुंचल्यातून सिद्ध झालेल्या प.पू.गुरुदेवांच्या भव्य तैलचित्राचे मा. नानासाहेब गोरे यांनी अनावरण करून मालार्पण केले.

प्रारंभीच डॉ. विलास संगवे, मा. नानासाहेब गोरे व कलावंत श्री. दादा भगाटे यांचा अनुक्रमे डॉ. वर्धमान कोठारी, मा. जंबुकुमार शहा व मा. मोतीचंद फुलचंद शहा (मुंबईकर) यांच्या हस्ते मान्यवरांना शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

त्यानंतर डॉ. विलास संगवे यांनी दीपप्रज्वलन करुन शैक्षणिक परिषदेचे उद्घाटन केले. आपल्या उद्घाटनपर भाषणात डॉ. संगवे यांनी भारताच्या सांस्कृतिक विकासात जैन धर्माचे व जैन संतांचे मोलाचे योगदान स्पष्ट करून सांगतांना ते म्हणाले,'धर्म व शिक्षण परस्परविरोधी नसून परस्परपूरकच आहेत.' आजच्या शिक्षण पद्धतीविषयी खंत व्यक्त करीत ते पुढे म्हणाले 'आज शिक्षण सार्वत्रिक झाले, पण सामाजिक मूल्याचा मात्र ऱ्हास झाला आहे. वस्तुतः शिक्षणातून जीवनमूल्यांचे जतन आणि समर्थ व्यक्तिमत्त्वाची निर्मिती व्हायला हवी आहे.

या उद्घाटनपर भाषणानंतर परिषदेचे संयोजक प्रा. धनंजय शहा यांनी परिषदेपुढील प्रस्तावित विषयामागील मनोगत व्यक्त केले व पहिल्या सत्रास प्रारंभ झाला. सत्रारंभी प.पू.गुरुदेवांचे शैक्षणिक योगदान या विषयावर आपला निबंध डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे यांनी सादर केला प.पू. गुरुदेवांच्या जीवनकार्याचा व त्यांच्या शिक्षणविषयक दृष्टिकोनाचा आढावा घेत त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले की शिक्षणाच्या माध्यमातून आपल्याला २१ व्या शतकातील जबाबदाऱ्या पेलू शकणारा समर्थ व अस्सल भारतीय माणूस घडवायचा आहे. बंधुभाव, प्रेम हीच शिक्षणमूल्ये प.पू.गुरुदेवांनी जीवनभर जतन केली. प.पू.गुरुदेवांनी गुरुकुलातून अमलात आणलेली शील, ज्ञान,

प्रेम, सेवा व व्यवस्था या पंचसूत्रीनेच व शिक्षणाने माणूस घडविण्याचे उद्दिष्ट साध्य होणार आहे.

सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. एस्. बी. गोगटे यांनी जीवनाभिमुखी शिक्षणाचे महत्त्व विशद करीत सांगितले की समता हेच आजचे खरे शिक्षणमूल्य आहे. त्याचबरोबर सर्वधर्मसमभाव समाजवाद, लोकशाही, न्याय, समाजपरिवर्तन ही उद्दिष्टेही शिक्षणातून साध्य व्हायला हवीत.

गारगोटी येथील मौनी विद्यापीठाच्या प्राचार्या डॉ. लीला पाटील यांनी समाजातील सर्व घटकांना शिक्षण सुलभ व्हायला हवे असे आग्रहाने सांगितले. त्या म्हणाल्या 'शिक्षण निश्चितपणे स्व-परकल्याणाचा मार्ग प्रशस्त करीत असते. आजच्या यांत्रिक आणि संगणकाच्या युगात देखील मानवी मेंदूचा वापर करायला शिकविणारे, निर्णयशक्तीचा वापर करायला प्रवृत्त करणारे व सहभाव निर्माण करणाऱ्या जीवनाभिमुख शिक्षणाची २१ व्या शतकात नितांत आवश्यकता आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ शिक्षण विभागातील सहाय्यक संचालिका सौ. अनुराधा गुरव यांनी स्त्री शिक्षणातील समस्या स्पष्ट केल्या. स्त्री शिक्षणाखेरीज व स्त्रियांच्या स्वतंत्र सबल व्यक्तिमत्त्व निर्मिती शिवाय खऱ्या अर्थाने २१ व्या शतकातील समाज विकसित होऊ शकणार नाही असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले.

पुणे येथील ज्ञान प्रबोधिनी चे डॉ. गिरीश बापट यांनी प. पू. गुरुदेवांच्या स्मृतींना उजाळा देत गुरुजनांच्या कार्यकर्ते निर्माण करण्याच्या कौशल्याचे कौतुक करीत महाराजांचे शिक्षणविषयक विचार आधुनिक दृष्टिकोनातून व त्यांचे शिक्षण व्यावहारिक पातळीवर कसे सफल बनविता येईल हे निरूपण केले. आपल्या परदेशातील अनुभवांच्या आधारे वर्तमान शिक्षण पद्धतीत विशेषत: माध्यमिक शिक्षण पद्धतीत काही व्यवहार्य बदलही सुचविले व ते करण्यासाठी उपायही सुचविले.

बाहुबली गुरुकुलाचे स्नातक प्रा. श्रीधर हेरवाडे [illegible] सांगितले की २१ व्या शतकातील शिक्षण भविष्याचा [illegible] घेणारे हवे. शिक्षण आईच्या दुधासारखे मूल्यवान हवे. गा[illegible] दुधासारखे केवळ किमती असायला नको.

पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. म. दा. नल[illegible] यांनी वर्तमान शिक्षण प्रणालीत पसरलेल्या अपप्रवृत्तींचा ख[illegible] समाचार घेत मूल्यशिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. आज[illegible] शिक्षणपद्धतीत व्यावहारिक नियोजनाअभावी आलेले [illegible] घालवल्याशिवाय २१ व्या शतकातील शिक्षण सफल हो[illegible] नाही असे सांगितले.

शैक्षणिक परिषदेचा समारोप करतांना सुप्रसिद्ध समाज[illegible] विचारवंत मा. श्री.नानासाहेब गोरे म्हणाले, दुर्दैवाने आम[illegible] देशात राष्ट्रीयत्वाचा अभाव दिसून येत आहे. शिक्षणाने [illegible] देशात एकता निर्माण केली पाहिजे. स्वातंत्र्य, समता [illegible] बंधुता हीच खरी शिक्षणमूल्ये आहेत. आमच्या समा[illegible] दलित स्त्रिया, परधर्मीय बांधव यांच्याबद्दल कमालीचा अनु[illegible] दृष्टिकोन आहे. सर्वत्र भ्रष्टाचार, स्वार्थ बोकाळला आहे [illegible] सर्व उपटून काढण्याचे एक फार मोठे आव्हान शिक्षकां[illegible] आहे. शिक्षकांना व विद्यार्थ्यांना यासाठी थोडे वेडे [illegible] असा सल्ला दिला व उद्याच्या भारतीय पिढीसंबंधी आशा[illegible] प्रकट केला.

मा. श्री. माणिकलाल तुळजाराम शहा व मा. श्री. शशिकांत शिवलाल शहा यांनी दोन्ही सत्रांचे सूत्रसंचाल[illegible] केले. प्राचार्य एस्. पी. कदम व डॉ. वर्धमान कोठा[illegible] यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेचे उत्तम संयोजन केले होते.

संयोजक
प्रा. धनंजय शहा
प्रा. महावीर कंडारक[illegible]

❖ ❖ ❖ ❖

**❑ सुविचार ❑**

पैसा हे साधन असून विद्या, धर्म, सद्गुण हे साध्य आहे. साधनाच्या पाठीमागे लागून साध्य गमावणे हे शहाणपणाचे नाही.

- प. प. गुरुदेव समंतभद्र महाराज

धर्म व शिक्षण या दोन गोष्टी परस्पर विरोधी नसून [illegible] परस्परपूरक आहेत आणि त्या नव्या पिढीच्या जडणघडणीला व चारित्र्य संवर्धनाला आवश्यक आहेत.

- प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराज



हार्दिक शुभेच्छा

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, बारामती (पुणे)

● स्थापना : ४-८-८३ ●

**३१ डिसेंबर १९९२ अखेर संस्थेची सांपत्तिक स्थिती**

| | |
|---|---|
| सभासद संख्या | १४१ |
| अधिकृत भाग भांडवल | २० लाख रु. |
| वसूल भाग भांडवल | १०.५८ लाख रु. |
| गंगाजळी व इतर निधी | १.०९ लाख रु. |
| बँक कर्ज | १५.०२ लाख रु. |
| बँक भाग गुंतवणूक | २.६६ लाख रु. |
| बँक मुदत ठेव गुंतवणूक | ०.९१ लाख रु. |
| सभासद कर्ज | २४.६८ लाख रु. |
| नफा (९१-९२) | १.१० लाख रु. |

वेळेवर कर्जपुरवठा, १००% वसूली.

सभासदांकरिता नजिकच्या काळात रु. ६०,०००/- पर्यन्त कर्जपुरवठा, अकस्मिक कर्ज मर्यादा रु. २०००/-, सभासदांना क्रेडीट कार्डची सोय, वस्तू खरेदी करिता कर्जपुरवठा, वसूली हप्त्यात वाढ करण्याचा विचार आहे.

● संचालक मंडळ ●

प्रा.डॉ.डी.व्ही.सरवदे (सचिव) प्रा.बी.बी.पाटील (अध्यक्ष)
श्री.डी.एल.पारख (खजिनदार) प्रा.के.एस.सनगर (सदस्य)
प्रा.आर.के.नाळे (सदस्य) प्रा.ई.के.पाटील (सदस्य)
श्री.एम.ए.सावंत (सदस्य) श्री.वाय.के.कुलकर्णी (सदस्य)
श्री.आर.जी.शहा (सदस्य) प्रा.कु.नलिनी क. शाहा (सदस्या)
प्रा.सौ.नीलम अ.पाटील (सदस्या)

● ● ● ●

With Best Complements From

The new generation polymer pencil that saves wood.




MAKUNE SOLMEX (INDIA) LTD.,

PLOT A - 5, M.I.D.C., BARAMATI.

Makers of New Generation, No Wood, Environmental Friendly polymer Pencils.